E-BOOK

सुपर डुपर हिट्स्

- दिलीप ठाकूर

६

"ई साहित्य प्रतिष्ठान"

सादर करीत आहे

"श्री. दिलीप ठाकूर"

लिखित

सुपर डुपर हिट्स

(भाग ६)

© - "श्री. दिलीप ठाकूर" (जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)

glam.thakurdilip@gmail.com 9870616216

"सुपर डुपर हिट्स" (भाग ६)

© लेखक : दिलीप ठाकूर

प्रकाशन : २५ ऑगस्ट २०२६

© esahity Pratishthan®2026

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे "ई बुक" वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी "ई साहित्य प्रतिष्ठान" ची लेखी परवानगी आवश्यक!

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

https://www.esahity.com

(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)

तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.

आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफ़ू !

लक्षात घ्या. हे बोलके "ई बुक" आहे. या "ई बुक" मधील प्रत्येक "फोटो"वर तसेच "निळ्या रंगातील मजकूर", यावर सुद्धा "लिंक्स" दिलेल्या आहेत. फक्त "क्लिक" करा, आणि त्यावरील "ऑडिओ व व्हिडिओज" चा मनसोक्त आनंद घ्या.

♥ लेखकांविषयी थोडेसे ♥

दिलीप ठाकूर
(जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)
जन्म २० एप्रिल १९६०

अलिबाग तालुक्यातील चौल गावात जन्म झालेल्या "दिलीप ठाकूर" यांचे बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन जीवन मुंबईत गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहाच्या खोलीत घडताना एकीकडे दक्षिण मुंबईतील अनेक चित्रपटगृहात स्टॉलच्या तिकीटात सतत नवे जुने चित्रपट पाहणे आणि त्या काळातील अनेक साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक वाचणे यात घडले. शिवाय गल्ली क्रिकेट आणि गल्ली चित्रपट यातून जनसामान्यांशी नाळ जुळली होतीच. त्यांनी गिरगावातील हिंद विद्यालय हायस्कूलमध्ये शालेय तर चौपाटीच्या भवन्स कॉलेज मध्ये उच्च शिक्षण घेतले. यातूनच विद्यार्थी दशेतच त्यांनी

विविध नियतकालिकांमधून वृत्तपत्र लेखन सुरु केले. एकाद्या लेखावरचे मत अथवा एकाद्या ताज्या घडामोडीवरचे आपले मत 'वाचकांच्या पत्रा'तून प्रसिद्ध होत आहेत या त्यांच्यासाठी खूपच मोठा उत्साहाचा भाग होता. मार्मिक, रसरंग, चित्रानंद, सोबत, लोकप्रभा, क्रीडांगण, मनोहर अशा साप्ताहिकातून आपली पत्रे तर कधी लेखही प्रसिद्ध होत असल्याने त्यांचा लेखनातील कल वाढला. १९८२ साली त्यांनी नवशक्ती दैनिकात प्रूफ रिडर म्हणून रुजू झाले आणि त्याबरोबरच रविवार नवशक्तीत चित्रपटविषयक सदरही लिहायला मिळाले. १९८६ साली त्यांना संपादकीय विभागात बढती देण्यात आली. तेव्हापासूनचा त्यांचा प्रवास खूप वळणा वळणाचा आहे. एकीकडे हॅन्ड कंपोझ (म्हणजे हाताने खिळे लावणे) ते डिजिटल मिडिया अशी तर दुसरीकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स ते ओटीटी प्लॅटफॉर्म अशी त्यांची वाटचाल आहे. ऐशी आणि नव्वदच्या दशकात त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणावर अनेक दैनिके आणि साप्ताहिकात विविध टोपणनावाने चित्रपटविषयक सदर लेखन केले. "राजा दिलीप", "स्पॉटबॉय", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "राजा

चौलकर", "राजा फिल्मीस्तानी" वगैरे टोपणनावानी खूपच मोठ्या प्रमाणावर लेखन केले. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रत्यक्षात शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जाणे, चौफेर निरीक्षण आणि लहान मोठ्या स्टार्ससह अनेक प्रकारचे तंत्रज्ञ आणि कामगार, चित्रपट वितरक व प्रदर्शक यांच्याशी संवाद साधणे यातून त्यांच्याकडे वेगळी माहिती, संदर्भ, तपशील, आठवणी यांची जमा होत गेली. याचीच पुढची पायरी म्हणून २००३ सालापासून त्यांचे चित्रपटविषयक लेख संग्रह प्रसिद्ध होत आहेत. आतापर्यंत त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात "स्थित्यंतरातील सिनेमा", "क्लॅप", "पैसा वसूल", "यादगार पल", "फर्स्ट डे फर्स्ट शो", "कॉर्नर सीट", "सिनेमा घर", "ओपन थिएटर", "बारा ते तीन तीन ते सहा", "गल्ला पेटी", "सिनेमा मसाला मिक्स", "आऊट फोकस", 'थिएटरातील टाळ्या शिट्ट्या', 'यश हेच चलनी नाणे' अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या अनघा प्रकाशन (ठाणे) यांच्या वतीने "टॉकीजची गोष्ट" हे दक्षिण मुंबईतील जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या आठवणी सांगणारे पुस्तक जुन्या

आठवणीत नेते. त्यात आता खाणाखुणाही शिल्लक नसलेल्या मॅजेस्टीक, रेक्स, रेडियो अशा चित्रपटगृहांवरही फोकस टाकण्यात आला आहे. इट्स मज्जा या यू ट्यूब चॅनेलसाठीचा त्यांचा 'ठाकूर विचारणार' हा मुलाखतींचा शो अतिशय लोकप्रिय आहे. अशोक सराफ, रणजीत, बाळ धुरी, विजय पाटकर, सुकन्या कुलकर्णी, अशोक समर्थ, उपेंद्र लिमये, वर्षा उसगांवकर, अश्विनी भावे आदींच्या त्यांच्या मुलाखतींची चित्रपटसृष्टीत बरीच चर्चा होत आहे. २००९ सालापासून ते मुक्त पत्रकार आणि लेखक म्हणून कार्यरत आहेत. जनसामान्य रसिकांना समजतो आणि आवडतो अशाच पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटांवर आणि त्या विश्वावर त्यांनी कायमच फोकस ठेवला. आणि त्यातूनच त्यांच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व स्तरांवर खूप ओळखी झाल्या. इसाक मुजावर आणि शिरीष कणेकर हे त्यांचे विशेष आवडते लेखक आहेत. शिरीष कणेकर यांच्या नाविन्य प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेल्या "निवडक शिरीष कणेकर" या ग्रंथातील लेखांची निवड व संपादन दिलीप ठाकूर यांनी केली आहे. विशेष

म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट' या शंभर वर्षातील मराठी चित्रपटांची तपशीलवार माहिती दिलेल्या सूचीच्या संपादनाची संधी त्यांना मिळाली. चित्रपटविषयक माहिती आणि अनुभवाचा त्यांना जवळपास सर्वच मराठी तसेच काही हिंदी वृत्तवाहिन्यांवर प्रतिक्रिया देताना, एकाद्या चर्चेत सहभाग घेताना कायमच फायदा होत असल्याचे दिसतेय. TIMES OF INDIA इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रातही त्यांची चित्रपटसृष्टीतील एकाद्या घटनेवर दशकभरापासून अधिक काळ सातत्याने प्रतिक्रिया येत आहे. त्यांना या वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त होत आहेत. विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने देण्यात आलेला चित्रकर्मी पुरस्कार, मराठी पत्रकार संघाच्या वतीने जयहिंद पुरस्कार आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार, संस्कृती कलादर्पणच्या वतीने उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार, इंडिवूड मिडिया एक्सलन्स ॲवॉर्ड, शिवसेना गिरगाव शाखा पुरस्कार, 'मी गिरगावकर' दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार, थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट

कलातीर्थ पुरस्कार, बालगंधर्व सन्मान चिन्ह (पुणे) इत्यादी अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. जवळपास रोजच तारीखवार जुन्या काळातील चित्रपटांबाबत सोशल मिडियात पोस्ट करणे यात त्यांनी सातत्य ठेवले आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपटापासूनच्या फोटो आणि बुकलेटचा त्यांच्याकडे उत्तम संग्रह आहे.

दिलिप ठाकूर यांना शुभेच्छा.
#संजीव_वेलणकर पुणे. ९४२२३०१७३३
♥

"मनोगत"

"शो हाऊसफुल्ल आहे... "

मला हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पिक्चर एन्जॉय करायला आवडते. कारण गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना अशाच एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पडद्यावरील डायलॉगला मनसोक्त मनमुराद टाळ्या व शिट्ट्या देत मी वाढलो. १९८२ साली मिडियात आलो, चित्रपट समीक्षक व पत्रकार म्हणून चौफेर व खणखणीत वाटचाल सुरू केली. मी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी व निरीक्षण असे करत करत वाटचाल सुरू ठेवल्याने मला पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे चित्रपटाचे जग माहीत होतं होत गेले. इतकेच नव्हे तर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत मला ओळखणारा खूपच मोठा वर्ग आहे हे विशेष उल्लेखनीय आहे. या प्रवासात चित्रपट विश्लेषक अशी प्रगती केली. या सगळ्यात माझ्यातील चित्रपट रसिक कायम राहीला. जनसामान्य प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा चित्रपट तोच माझा

चित्रपट. अशा सर्वज्ञात चित्रपटावर लिहिणे, बोलणे जास्त आव्हानात्मक असते. कारण संदर्भ, माहिती, तपशील अजिबात चुकुन चालत नाही. अशाच काही सुपर डुपर हिट चित्रपटावरचे माझे ई बुक. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीत रसिकांची आवडनिवड ही अतिशय महत्त्वाची गोष्ट. त्यांच्या संवेदनशीलतेवर मी कायमच विश्वास ठेवला आणि मी त्यांच्यातीलच एक आहे अशी भावना जपली. आजही मल्टीप्लेक्समध्ये चित्रपट एन्जॉय करतांना एखाद्या डायलॉगला मनापासून दाद देतो. आपण चित्रपट समीक्षक आहोत तेव्हा आपण गंभीरच असावे असे मी वागण्या बोलण्यात का आणू? आपण जनसामान्याचे प्रतिनिधी आहोत, त्यातून आलो आहोत हे विसरत नाही. म्हणून त्यांना आपलेसे वाटतील असे माझे विषय असतात.... आणि सुपर डुपर हिट ही खूपच मोठी गोष्ट. त्यामुळे सामाजिक सांस्कृतिक माध्यम आणि आर्थिक वातावरण बदलून जाते. अनेक यशोगाथा जन्माला येतात. गॉसिप, ग्लॅमर, फिल्मी गप्पा, गल्ला पेटी अशी सगळीकडे त्या यशाची चर्चा रंगते. सेलिब्रिटीजचा आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या कारकिर्दीला गती

येते. त्याला इमेज मिळते. एक सुपर डुपर हिट मंगता है यार असे उगाच म्हटले जात नाही. अशा अनेक गोष्टी यशात असतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणजेच हे पुस्तक सुपर डुपर हिट....

माझा अनेक वर्षांपासूनचा जिवलग मित्र डॉ. अनंत पावसकर यांनी काही महिन्यांपूर्वी अतिशय प्रेमाने पुढाकार घेऊन माझे "शोले पन्नास वर्षे" हे पहिले "ई बुक" प्रकाशित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली! ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने ते पुस्तक प्रकाशित झाले. भरपूर माहिती व मनोरंजन असलेल्या त्या ई बुकला रसिक वाचकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, आजही मिळतोय. त्यामुळे अधिक उत्साहाने हे पुस्तक आपल्या समोर आणत आहे. या पुस्तकातील लेख तात्कालिक आहेत. पण चित्रपट सर्वकालीन सुपरहिट आहेत. हे पुस्तक जुन्या काळातील चित्रपट रसिकांना एक उत्तम फ्लॅशबॅक आहे तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला हे चित्रपट पहावेसे वाटतील. ई बुक हे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत असते आणि आपले पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे ही लेखकाची मनोमन इच्छा असतेच असते. चित्रपट आणि

चित्रपटसृष्टी यावर माझी मुद्रित माध्यमापासून माझी आतापर्यंत चव्वेचाळीस (४४) पुस्तके प्रकाशित झाली आहेत. चित्रपटसृष्टीतील मोठ्या सेलिब्रिटींज पासून सेटवरील कामगारांपर्यत आणि चित्रपट वितरकापासून कला दिग्दर्शकापर्यत अशा सर्वच स्तरातून मी सातत्याने काम करताना ही चित्रपटसृष्टी अधिकाधिक प्रमाणात जाणून घ्यायला मी कायमच उत्साह दाखवला. चित्रीकरणासाठीचे स्टुडिओ ते मिनी थिएटर्स असा माझा प्रवास सुरू आहे हे माझ्या अनेक पुस्तकांतून आपणास लक्षात येईलच वा आले असेल. मुद्रित माध्यमे, वृत्त वाहिन्या व डिजिटल युग असा माध्यमे स्वीकारत ही वाटचाल सुरू आहे आणि त्याच वाटचालीत हे "सुपर डुपर हिट" हे पुस्तक! आपण याही पुस्तकाचे नक्कीच स्वागत कराल याचा नक्कीच विश्वास आहे. अर्थात, इतकी वर्षे सतत काम करीत असतानाही आजही नवीन गोष्टी शिकण्याची व जाणून घेण्याची माझी इच्छा कायम आहे! मी आजही विद्यार्थी म्हणून वावरतोय....!

दिलीप ठाकूर (ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट विश्लेषक)

♥

सादर करीत आहे.. "श्री. दिलीप ठाकूर" लिखित "सुपर डुपर हिट्स" (भाग ६)

♥

अनुक्रमणिका

९१. चित्रपती व्ही. शांताराम.. (१८)

९२. "सरफरोश" @ पंचविशी पार.. (५७)

९३. "चोर मचाए शोर" @ पन्नाशीपार.. (७१)

९४. "काला पानी" @ ६८ वर्षे.. (८४)

९५. "खोटे सिक्के" @ ५२ वर्षे.. (९५)

९६. "जॉनी मेरा नाम" @ ५६ वर्षे.. (११०)

९७. "हीरो" @ ४२ वर्षे.. (१२८)

९८. "जोशिले" @ ३७ वर्षे.. (१४१)

९९. "मल्टी स्टार कास्ट" सिनेमे.. (१५२)

१००. "नहले पे दहला" @ ५० वर्षे.. (१६७)

१०१. यश "शोले" व "डिडिएलजे" चे.. (१७८)

१०२. "व्हिडिओज धमाका" पडद्यामागच्या गोष्टी, धमाल किस्से आणखी बरंच काही..!!!!

१०३. "आभार!!!!"

लेख क्र. ९१

चित्रपती व्ही.शांताराम : '१२५' वी जन्मशताब्दी चित्रपट माध्यम व व्यवसायाचा महावृक्ष!

चित्रपटाचे जग आपण अनुभवू तसे..!!

काही वास्तूंमध्ये प्रवेश करताच काही वेगळेपण जाणवते. त्या वास्तूच्या उभारणीतील महनीय व्यक्तीचे आजही तेथे अस्तित्व आहे असे जाणवते...!

परेल येथील 'राजकमल कलामंदिर'च्या वास्तूत अनेक वर्ष मी जातो आहे, यापुढेही जाणार आहे. पण जस जसे या स्टुडिओचे प्रवेशव्दार जवळ जवळ येत जाते चित्रपती व्ही.शांताराम यांच्या अलौकिक कर्तृत्वाची जणू छाया तेथे

जाणवते. आजही ते या स्टुडिओत कुठे तरी आसपास आहेत, अथवा सेटवर एकाद्या प्रसंगाचे दिग्दर्शन करीत आहेत, या स्टुडिओतील कार्यालयात आहेत, स्टुडिओत फेरफटका मारत मिनी थिएटरपासून लायब्ररीपर्यंत सगळी कामे वेळेवर नि व्यवस्थित सुरु आहेत ना हे ते पाहताहेत असे वाटते..!!

चित्रपती व्ही. शांताराम यांची भारतीय चित्रपटसृष्टीतील वाटचाल दीर्घकालीन आणि अतिशय उल्लेखनीय अशीच. १८ नोव्हेबर रोजी त्यांचे १२५ वे जन्मशताब्दी वर्ष सुरु झालं आहे, त्यानिमित्त हा विशेष फोकस. व्ही. शांताराम हे

अगदी मूकपटाच्या काळापासून ते या माध्यम व व्यवसायात सक्रीय. १९२५ सालच्या महाराष्ट्र फिल्म कंपनी, कोल्हापूर निर्मित व बाबूराव पेंटर दिग्दर्शित "सावकारी पाश" या चित्रपटात व्ही.शांताराम यांनी 'हरबा' ही व्यक्तीरेखा साकारली. चित्रपट माध्यम व व्यवसायाच्या बदलत्या प्रवासाचे ते एक साक्षीदार आहेत. त्यांनी मराठी आणि हिंदी

अशा दोन्ही भाषांत ,९२ चित्रपट निर्माण केले आणि ५५ चित्रपट दिग्दर्शित केले, तसेच तेच आपल्या चित्रपटाचे संकलक असत, त्यांना ते गरजेचे वाटे. पंचवीस चित्रपटात त्यांनी भूमिका साकारल्या.

व्ही.शांताराम हे चित्रपट माध्यम व व्यवसायाची अतिशय उत्तम जाण असलेले दिग्दर्शक. मनस्वी, जिद्दी, करारी आणि विलक्षण खंबीर. कामाला जणू वाघ! अखेरपर्यंत त्यांनी स्वप्न पाहिली ती भव्य निर्मितीची आणि त्यांना भारत सरकारच्या वतीने दादासाहेब फाळके पुरस्काराने तसेच 'पद्मविभूषण' देत सन्मानित करण्यात आले.

१ जून १९२९ रोजी पुण्यात प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. त्यात केशवराव धायबर, विष्णुपंत दामले, साहेबमामा फत्तेलाल आणि व्ही.शांताराम असे चार भागीदार होते. प्रभात फिल्म कंपनीत असताना व्ही.शांताराम यांनी सुरुवातीस पौराणिक चित्रपटही बनवले

पण १९३७ सालच्या "कुंकू" पासून सामाजिक आशयाकडे ते वळले.

१९४२ साली व्ही.शांताराम यांनी प्रभातमधून बाहेर पडून राजकमल कलामंदिर स्टुडिओ उभारला, राजकमलची तुतारी फुंकली आणि आपली चित्रपट निर्मिती व दिग्दर्शन यांची यशस्वी वाटचाल सुरु ठेवली. राजकमल कलामंदिरची स्थापना केल्यावर मुंबईत आपला स्टुडिओ हवा म्हणून त्यांनी प्रयत्न केला आणि त्यांनी जे. बी. एच. वाडिया यांजकडून 'सेन्ट्रल स्टुडिओ' विकत घेतला. १९४२ साली अडिच लाख रुपये ही प्रचंड मोठी रक्कम होती आणि त्याचा राजकमल कलामंदिर स्टुडिओ उभारला (चित्रपट

पटकथाकार व पत्रकार वसंत साठे यांच्या "बखर सिनेमाची" या पुस्तकात हा अतिशय महत्वाचा संदर्भ आहे).

"राजकमल कलामंदिर"चा पहिला चित्रपट "शकुंतला" (१९४३) गोष्ट, नृत्य, रंग व संगीत यांना आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटात त्यांनी कायमच महत्व दिले. कृष्णधवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटातही त्यांचा आपला एक रंग असे आणि रंगीत चित्रपटात तर त्याचा प्रभावी वापर असे. त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील श्रेय नामावलीत ("दो ऑखे बारह हाथ" या चित्रपटाची श्रेयनामावली आवर्जून पहा.. त्यांच्या प्रत्येक चित्रपटातील श्रेयनामावलीत दिग्दर्शक दिसतो), आपल्या चित्रपटाची पोस्टर्स, त्याचे प्रदर्शन आणि मेन थिएटरमधील फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट यांना ते फारच महत्व देत. आपल्या "शांतारामा" या चरित्रात त्यांनी याहीबाबतीत बरेच काही सांगितलय! (प्रेक्षक प्रतिसाद जाणून घेण्या बाबतची त्यांची असोशी नवीन पिढीतील सिनेमावाल्यानीही शिकावी अशी

आहे!) आपला चित्रपट कोणत्या चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे याबाबत ते जागरुक असत. त्याचे मेन थिएटर "लिबर्टी" असावे की "ऑपेरा हाऊस" की आणखीन कोणते? याचा ते बारकाईने अभ्यास करत आणि पहिल्याच दिवशी ते स्वतःच चित्रपटगृहावर जात आणि एखादा प्रसंग कंटाळवाणा वाटल्यास चक्क लगेचच कात्री लावत. "जल बिन मछली नृत्य बिन बिजली" हा चित्रपट अनेक गोष्टींमुळे वैशिष्ट्यपूर्ण होता. यातील "संगीत आणि पार्श्वसंगीत" हे भारतातील पहिले "स्टिरिओफोनिक" प्रकारातले ध्वनिमुद्रण! सलाम "मंगेश देसाई" यांना! आपली संकल्पना त्यांनी "लक्ष्मीकांत-प्यारेलाल" यांना सांगत तो "संगीताविष्कार" घडवून आणला. (गाण्यांची "लिंक" देतोय. हेडफोन वापरत ऐका) पण आपल्या या चित्रपटाच्या "क्लायमॅक्स" बाबत साहेब नाखूश होते. "क्लायमॅक्स" आवडला नाही म्हणून त्यांनी तो बदलला आणि रि-शूटींग केले. तर "तुफान और

दिया" या चित्रपटातील राजेंद्र कुमारच्या भूमिकेला बरीचशी काट मारली!

त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गीत, संगीत व नृत्य हा एक स्वतंत्र मोठा विषय! मग ते गाणे "नैन सो नैन नाही मिलाओ.." असो अथवा "ऐ मालिक, तेरे बंदे.." असो! आपल्या चित्रपटातील नृत्याची कलाकारांनी भरपूर तालीम (रिहर्सल) करावी याबाबत त्यांचा विलक्षण आग्रह! "झनक झनक पायल बाजे" या चित्रपटातील गीत संगीत व नृत्यासाठी गोपीकृष्ण व संध्या यांना महिनोन महिने तालिमी करायला लावल्या. सेटवर वेळेवर यायला हवे ही त्यांची शिस्त! पटकथा व संकलन या गोष्टीवर त्यांचा विलक्षण कटाक्ष असे. या माध्यम व व्यवसायाशी ते एकरुप एकनिष्ठ झालेले असे व्यक्तीमत्व! तसेच मराठीतील पहिला बोलपट "अयोध्येचा राजा" (मुंबईत प्रदर्शित ६ फेब्रुवारी १९३२. गिरगावातील मॅजेस्टिक सिनेमागृहात हा चित्रपट प्रदर्शित झाला). या चित्रपटाची निर्मिती "प्रभात फिल्म कंपनी"ची

असून दिग्दर्शन व्ही.शांताराम यांचे आहे. म्हणजेच मूकपटाकडून बोलपटाकडे प्रवास करताना पहिला मराठी बोलपट व्ही.शांताराम यांचा आहे!

प्रभात फिल्म कंपनी याच निर्मिती संस्थेच्या व्ही.शांताराम यांचे संकलन व दिग्दर्शन असलेल्या "सैरंध्री" (१९३३) या चित्रपटाचीही काही वैशिष्ट्ये आहेत. या चित्रपटाव्दारे भारतीय चित्रपटांच्या ध्वनिमुद्रिका सुरु झाल्या. या चित्रपटाच्या रसायन व आवृत्तीचे काम जर्मनी येथील "उफा" स्टुडिओत झाले आणि ध्वनिमुद्रिकाही तेथेच काढण्यात आल्या. अशा ध्वनिमुद्रिका बनवण्याची पहिली कल्पना शांतारामबापूंना सुचली! ते काळाच्या खूपच पुढचा विचार करत हेच यातून अधोरेखित होत आहे. सैरंध्री चित्रपट मराठीबरोबरच हिंदीतही निर्माण करण्यात आला होता!

व्ही.शांताराम दिग्दर्शित व संकलीत "माणूस" (१९३९) या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटात सर्वप्रथम आपल्या देशातील चित्रपटातील पहिले बहुभाषिक गाणे

आहे! मराठीबरोबरच उर्दू, गुजराती, पंजाबी, बंगाली व तमिळ भाषेतील एकेक कडवे होते! गाण्याचे बोल होते, "प्रेमी प्रेम नगर में जाए... लुटूया प्रेमाचा बाजार"! हे गीत अनंत काणेकर यांचे तर संगीत मास्टर कृष्णराव यांचे! हिंदीत 'आदमी'!

व्ही.शांताराम दिग्दर्शित "अमृत मंथन" (१९३४) या चित्रपटात आपल्याकडील चित्रपटात पहिला 'क्लोजअप' पाह्यला मिळाला. "झनक झनक पायल बाजे" हा आपल्या देशातील पहिला "टेक्निकलर" चित्रपट! म्हैसूर (कर्नाटक) येथील वृंदावन गार्डन येथे या चित्रपटातील काही दृश्य चित्रीत केली. संगीतकार वसंत देसाई यांनी या चित्रपटासाठी फक्त भारतीय वाद्यांचाच उपयोग केला. या चित्रपटातील संध्याजींचे दीप नृत्य शास्त्रीय संगीतावर आधारित आहे. याच चित्रपटाच्या निर्मितीबाबत शिवाजी पार्क येथे व्ही.शांताराम यांच्या सत्काराचे आयोजन केले असता त्यात त्यांना "चित्रपती व्ही.शांताराम" असे गौरवण्यात आले आणि तीच

त्यांची विशेष ओळख बनली. त्यांनी दिग्दर्शिलेला "अमर भूपाळी" बंगाली भाषेत डब करण्यात आला तसेच चैन्नईतही लोकप्रिय ठरला. व्ही.शांताराम दिग्दर्शित "शकुंतला" हा चित्रपट १०४ आठवडे चालला. त्यांच्या चौफेर व वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीत महत्वाचा चित्रपट म्हणजे 'पिंजरा' (१९७२)! पुणे शहरात "प्रभात" थिएटरमध्ये हा चित्रपट ३१ मार्च १९७२ रोजी प्रदर्शित झाला तर मुंबईत हा चित्रपट सेन्ट्रल, प्लाझा आणि भारतमाता येथे १४ एप्रिल १९७२ रोजी प्रदर्शित झाला आणि मग त्याची संपूर्ण महाराष्ट्रभर यशस्वी घौडदौड सुरु झाली आणि राज्यात नऊ शहरात खणखणीत रौप्यमहोत्सवी
यश संपादले. रसिकांना या "पिंजरा" मध्ये
अडकणे आवडलं! आता 'पिंजरा' म्हणता क्षणीच रसिकांच्या एका पिढीला त्याची गोष्ट, गाणी आणि अगदी थीमनुसार पोस्टर असे सगळे आठवले असेल. त्या काळात हा चित्रपट

म्हणजे प्रचंड मोठी 'क्रेझ' निर्माण झाली होती. या 'पिंजरा' चे मध्यवर्ती

कथासूत्र म्हणजे मराठी चित्रपटात कथा हीच स्टार असते असे म्हणतात त्याचाच प्रत्यय देणारे. याचे कथाबीज हॉलीवूडचा चित्रपट 'ब्लू एंजल' यावर आधारित आहे असे म्हटले गेले तरी त्याची महाराष्ट्रीय संस्कृती आणि मराठी चित्रपटाची वैशिष्ट्ये यानुसार ती गोष्ट सजवण्यात अथवा रंगवण्यात आली आहे हे विशेषच कौतुकाचे आहे आणि हेच या चित्रपटाचे सर्वात मोठे यश आहे. व्ही. शांताराम, अनंत माने आणि शंकर पाटील या तिघांनी मिळून या चित्रपटाच्या पटकथा आणि संवादवर भरपूर मेहनत घेतली आणि तो शंभर टक्के मराठी चित्रपट ठरला. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातून फिरणारे एक तमाशा पथक अशाच एका गावात येते. त्या काळात खेड्यापाड्यातील सर्वात मोठे मनोरंजन म्हणजे तमाशा हेच असल्याने या तमाशाला प्रत्येक गावात उत्फूर्त प्रतिसाद मिळतोय. अशाच एका गावात या

तमाशाचा फड रंग भरु लागतो. या तमाशाच्या बोर्डावर नाचणारी कोल्हाटीण चंद्रकला (संध्या) या तमाशाचे सर्वात मोठे आकर्षण आहे. चंद्रकलाचे बहारदार लावणी नृत्य म्हणजे पब्लिक प्रचंड खुश आणि टाळ्या शिट्ट्यांनी थिएटर डोक्यावर घेणारच हे ठरलेले. त्याच गावात एक आदर्श शिक्षक (डॉ. श्रीराम लागू) हे अतिशय सुसंस्कृत आणि उच्चवर्णिय असे आहेत! आपल्या गावाला वळण लागावे म्हणून ते रात्रशाळा घेतात, तेथे गावकरी उत्साहाने येतात. पण जस जसा तमाशाचा फड रंगात येतो तस तशी शाळेला गळती लागते. यावर मास्तर शोध घेतात तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, हा सगळा त्या तमाशाचा परिणाम आहे. म्हणून ते तो तमाशाच बंद करण्याचे ठरवतात. पण चंद्रकला अतिशय कावेबाज, धूर्त, मुत्सद्दी ती सहजी हार मानत नाही! एकदा आपला पाय मुरगळलाय असे सांगून ती मास्तरांची सहानुभूती मिळवते. तेव्हा ते तिच्यासाठी एक 'लेप' तयार करुन आणतात व तिच्या मांडीला तो लेप लावत असतानाच

ते तिच्या सौंदर्याच्या जाळ्यात अडकतात. तत्क्षणी त्यांचा स्वतःशीच संघर्ष निर्माण होतो. आपले आदर्श, सुसंस्कारीत मन की स्त्री सौंदर्याचे आकर्षण असा
तो संघर्ष असतो. ते तिच्या एका लाघवी भाषेला
भुलतात. चित्रपट हळूहळू 'रंग' बदलतो.

चंद्रकलाने उघडलेल्या 'पिंजरा'त मास्तर अडकतात. आणि मग ते अडकतच जातात. आपली मूल्ये, संस्कृती, सभ्यता सगळे सोडून ते
चंद्रकलाचे होतात. ती त्यांना जणू वेडे करते. या
तमाशा फडासोबत त्यांची फरफड होत जाते. तोपर्यंत मराठी चित्रपटात 'तमाशा' हा केन्द्रस्थानी असलेले अनेक चित्रपट आले, पण हा अगदी वेगळा असा ठरला. याचे कारण म्हणजे व्ही. शांताराम यांची प्रभावी आणि कल्पक अशी हाताळणी. विशेषतः प्रतिकात्मक दृश्य हे आपले वैशिष्ट्य या चित्रपटात त्यांनी खुबीने वापरले. मास्तर चंद्रकलाकडे कळत नकळतपणे आकर्षित होत जाताना त्यांनी पोपटाचा पिंजरा

दाखवला आणि त्याच वेळी मास्तरांच्या मनातील घालमेलही दाखवली. या चित्रपटाचे छायाचित्रण, संगीत आणि अभिनय याला राजकमल कलामंदिर टच होता. या चित्रपट निर्मिती संस्थेची प्रतिष्ठा या चित्रपटात पाह्यला मिळाली. तमाशाच्या फडाचे एका वेगळ्या कोनातून या चित्रपटात दर्शन घडते. म्हणून तर त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'राष्ट्रीय पुरस्कार' या 'पिंजरा'ला प्राप्त झाला! व्ही. शांताराम हे आपल्या प्रत्येक चित्रपटातील गाणी कमालीची चांगली असावीत यासाठी अधिकाधिक प्रयत्नशील असत. त्यांच्या दिग्दर्शनातील 'दो आखें बारह हाथ', 'नवरंग', 'गीत गाया पत्थरोने', 'डॉ. कोटणीस की अमर कहानी', 'सेहरा' या चित्रपटातील गाणी त्याचा प्रत्यय देतात. आपल्या एका चित्रपटात तब्बल दहा बारा गाणी असणे त्यांना फारसे गैर वाटत नसे. किंबहुना गाणी हे आपल्या भारतीय चित्रपटाचे जगावेगळं वैशिष्ट्य आहे यावर त्यांचा विश्वास असे. 'पिंजरा' मध्येही तब्बल दहा गाणी आहेत, एकेका गाण्याचे शब्द, मुखडा आणि चाल

यासाठी व्ही. शांताराम प्रचंड आग्रही राहिले. या चित्रपटाची गीते जगदीश खेबूडकर यांची असून संगीत राम कदम यांचे आहे. खरं तर 'पिंजरा' पडद्यावर येईपर्यंत अनेक मराठी चित्रपटांसाठी ते एकत्र आले होते, एकमेकांच्या कामाची पद्धत माहित होती. तरीही त्यांना या चित्रपटासाठी विशेष मेहनत घ्यावी लागली. 'कुण्या गांवाची कोनच्या नावांची..' हे अगदी चित्रपटाच्या सुरुवातीलाच गाणे आहे. त्यावरच या चित्रपटाची श्रेयनामावली आहे. तमाशाचा फड एका गावातून दुसरा गावात चाललाय असे त्यातून सुचवायचे आहे. व्ही. शांताराम हे कायमच आपल्या चित्रपटाच्या थीमनुसार आपल्या चित्रपटाची श्रेयनामावली असावी यासाठी आग्रही असत. त्यांच्या त्या वैशिष्ट्याचे त्या काळात मोठ्या प्रमाणात कौतुक केले जाई. याशिवाय या चित्रपटात 'नका तोडू पावणं जरा थांबा', 'छबीदार छबी मी तोरात उभी', 'मला लागली कुणाची उचकी', 'देरे कान्हा चोळी लुगडी..', 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल..', 'मला इस्काची इंगळी डसली..', 'दिसला ग

बाई दिसला..' आणि शेवटचे गाणे 'कशी नशिबानं थट्टा आज मांडली..' अशी सगळी गाणी आजही लोकप्रिय आहेत. महत्वाचे म्हणजे यातील कोणतेही गाणे ऐकताना चित्रपटातील त्याचे स्थान डोळ्यासमोर येते हे विशेषच आहे. या गीतात एक वेगळाच बाज आहे. पार्श्वगायिका उषा मंगेशकर यांना या चित्रपटाने दिलेल्या संधीचे त्यांनी सोने केले. तसेच लता मंगेशकर, सुधीर फडके, महेंद्र कपूर, जयवंत कुलकर्णी, वाघमारे यांनीही ही गाणी गायलीत. शहरापासून ग्रामीण भागात दूरवर तळागाळापर्यंत ही गाणी आणि या गाण्यांसह चित्रपट पोहचला. या चित्रपटाचे कला दिग्दर्शक बाबूराव जाधव आहेत तर छायाचित्रण शिवाजी सावंत यांचे आहे. प्रत्येक बाबतीत व्ही शांताराम यांचा टच दिसतोय. विशेष म्हणजे डॉ. श्रीराम लागू यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. तोपर्यंत ते मराठी रंगभूमीवर कार्यरत होते. 'नटसम्राट' या नाटकाचे प्रयोग अधिकाधिक उंचीवर नेत होते. पण व्ही. शांताराम यांनी त्यांना 'पिंजरा' तील मास्तर

साकारायची खास विनंती केली. लागू यांनी व्ही. शांताराम यांचे अनेक चित्रपट पाहिले असल्याने त्यांनी होकार दिला आणि विशेष म्हणजे कोल्हापुरात शालिनी स्टुडिओत या चित्रपटाचे शूटिंग असताना आपले दृश्य चित्रीत झाले तरी ते व्ही. शांताराम यांची दिग्दर्शन कार्यशैली पाहत सेटवरच बसत. ते बरेच काही जाणून घेत. त्यात त्यांची नवीन गोष्टी शिकण्याची प्रवृत्ती दिसते आणि व्ही शांताराम यांचे प्रत्यक्षात सेटवर दिग्दर्शन अनुभवणे ही तर मोठीच सोनेरी संधी!

संध्याजी राजकमल कलामंदिरच्या हुकमी नायिका होत्या! त्या नृत्यात कमालीच्या तरबेज असल्याने आणि त्यांच्याकडे उत्तम अभिनय समज असल्याने त्यांनी ही भूमिका उत्तम वठवली. आजही 'यू-ट्यूब'वर यातील कोणतेही गाणे पहा, त्यात नृत्य आणि दृश्य सौंदर्य दिसते. खुद्द व्ही. शांताराम आपल्या चित्रपटातील प्रत्येक गाण्याच्या जन्मावर आणि मग टेकिंगवर विशेष लक्ष देत. या चित्रपटातील गाण्यांचे मुखडे, मग अंतरा आणि चाल यावर

गीतकार जगदीश खेबूडकर आणि संगीतकार राम कदम यांनी वारंवार सतत मेहनत घेतली, नवीन रचना केल्या आणि त्यावर खूप पारखून व्ही शांताराम यांनी होकार दिला आणि मग प्रत्यक्षात चित्रीकरणाच्या वेळीही त्यांनीच त्यावर संस्कार केले. तात्पर्य, नृत्य दिग्दर्शकावर गाणे सोपवून आपण सेटबाहेर बसावे असे त्या काळातील दिग्दर्शकांची पध्दत नव्हती म्हणूनच गाण्यातून चित्रपट पुढे जातोय असे दिसे. पूर्वीच्या अनेक कलाकृती अजरामर झाल्या त्यात हा घटक खूपच महत्वाचा! विशेष म्हणजे मुंबई महाराष्ट्रात 'दूरदर्शन'चे आगमन होण्याच्या काही महिने अगोदरचा हा काळ होता आणि तेव्हा चित्रपटात गाणी पाहणे याशिवाय रेडिओ, लाऊडस्पीकर, वाद्यवृंद, इराणी हॉटेलमधील जुक्स बॉक्स अशी काही मोजकीच माध्यमे गाणी ऐकण्यासाठी असत. पण गाणीच अशी श्रवणीय की अशी मोजकीच माध्यमे असूनही ती लोकप्रिय झाली, ओठांवर आली आणि केवळ गाणी पाहण्यासाठी अनेक रसिकांनी 'पिंजरा' पुन:पुन्हा

थिएटरमध्ये जाऊन पाहिला. याशिवाय या चित्रपटात निळू फुले, वत्सला देशमुख, माणिकराज, गोविंद कुलकर्णी, कृष्णकांत दळवी, सरला येवलेकर, आबू, शोभा, भालचंद्र कुलकर्णी, बर्चीबहाद्दर इत्यादींच्याही भूमिका आहेत. या छोट्या छोट्या व्यक्तिरेखाही लक्षात राहतात!

या चित्रपटाच्या खणखणीत यशाने आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली. या चित्रपटापूर्वी मराठीत १९६५ साली व्ही. शांताराम यानीच मराठीतील पहिला रंगीत चित्रपट 'इये मराठीचिये नगरी' निर्माण केला होता. पण तरीही मराठीत कृष्ण धवल अर्थात ब्लॅक ॲण्ड व्हाईट चित्रपटाचाच काळ सुरु राहिला. त्यानंतर व्ही. शांताराम यांनी 'पिंजरा' पुन्हा रंगीत चित्रपट निर्माण केला, तो सुपर हिट झाल्यावर हळूहळू का होईना पण मराठीत रंगीत चित्रपटाचे युग सुरू झाले. तरीही आठ दहा वर्षे मराठीत काही चित्रपट 'ब्लॅक ॲण्ड व्हाईट' तर रंगीत येत राहिले. पण 'पिंजरा'च्या यशाने मराठी चित्रपटसृष्टीत रंगाचे महत्व पटू लागले! सिध्द झाले. हेही

चित्रपती व्ही.शांताराम यांचे मराठी चित्रपटसृष्टीला मोठे देणं आहे! ...मराठी "पिंजरा"ची व्ही. शांताराम यांनीच १९७३ साली हिंदीत "पिंजडा " या नावाने केलेली रिमेक मात्र रसिकांनी नाकारली! मुंबईत मेन थिएटर मराठा मंदिर चित्रपटगृहातून हा चित्रपट
अवघ्या काही आठवड्यातून उतरला, प्लाझा
चित्रपटगृहात मात्र काही काळ मुक्काम केला.

मराठी चित्रपटसृष्टीचा मानबिंदू म्हणून "पिंजरा"ची ओळख आहे, तशीच मराठी माणसाचा उत्तम दर्जेदार चित्रपटाचा स्वाभिमान अशीही "पिंजरा "चा उल्लेख करायला हवा!

आपले चित्रपटाचे जग कधी, कसा, कुठे व का आश्चर्याचा धक्का देईल आणि एकादा सुखद सोनेरी/ चंदेरी योग जुळून आणेल हे सांगू शकत नाही. म्हणूनच तर अशा सुखद क्षणांच्या आठवणी आपण जपायच्या आणि काही

विशिष्ट निमित्ताने त्या हळवेपणाने व्यक्त कराव्यात, अशीच एक खास आठवण अथवा फ्लॅशबॅक!

चित्रपती व्ही.शांताराम, अभिनय कोहिनूर दिलीपकुमार व स्वरयात्रा लता मंगेशकर एकत्र येणे हासुध्दा असाच एक महत्त्वपूर्ण योग. खरं तर कोणत्याही चित्रपटासाठी हे तिघेही एकत्र येण्याचा योग कधीच आला नाही. लतादीदी व दिलीपकुमार हे मानलेले भाऊ व बहिण आहेत! लतादीदी दिलीपकुमारना राखी बांधत! १९९६ साली अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला रंगलेल्या लता मंगेशकर यांच्या भव्य संगीत कार्यक्रमास दिलीपकुमारची खास उपस्थिती होती. व्ही.शांताराम यांच्या राजकमल कलामंदिर या निर्मिती संस्थेच्या कोणत्याच चित्रपटात दिलीपकुमारने भूमिका साकारली नाही. मात्र दिलीपकुमारची भूमिका असणाऱ्या यश चोप्रा दिग्दर्शित 'मशाल' इत्यादी अनेक चित्रपटांचे राजकमलमध्ये चित्रीकरण होताना दिलीपकुमार व व्ही.शांताराम या दोन दिग्गजांची या स्टुडिओतील

व्ही.शांताराम यांच्या कार्यालयात भेट होऊन गप्पा रंगत. तर लता मंगेशकर यांनी व्ही.शांताराम दिग्दर्शित 'झनक झनक पायल बाजे' (१९५५), 'दो ऑखे बारह हाथ '(१९५७), 'सेहरा' (१९६३, 'पिंजरा' (१९७२) इत्यादी अनेक चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले आहे. तसेच लता मंगेशकर यांनी निर्मिती असलेला व गुलजार दिग्दर्शित 'लेकिन' या चित्रपटाचा याच राजकमल कलामंदिरमध्ये दीदींच्या वाढदिवसानिमित्त २८ सप्टेंबर १९८७ रोजी अतिशय थाटात मुहूर्त झाला. आजही या मुहूर्ताचा भावनिक क्षण आठवतोय. विनोद खन्ना, डिंपल खन्ना व अमजद खान यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या लताजींच्या या चित्रपटाच्या मुहूर्ताला क्रिकेटर सुनील गावसकर याची खास उपस्थिती होती!

या तिघांच्या भिन्न स्वरुपातील भेटीगाठी वा आठवणी यांचा हा ट्रेलर... दो 'ऑखे बारह

हाथ'मधील जेलरची भूमिका दिलीपकुमारनेच करावी असा प्रयत्न पूर्ण होऊ न शकल्याने व्ही.शांताराम यांनीच ती साकारलीय असाही एक किस्सा प्रसिद्ध आहे!

पण हे तिघेही दिग्गज एकत्र येण्याचा सुयोग एकदा मात्र आला. आणि म्हणूनच तर तो येथे सांगावासा वाटतोय...

हा योग जवळपास चाळीस वर्षांपूर्वीचा! आपल्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्रातील एकूणच चित्रपटसृष्टीने १० ऑक्टोबर १९८६ रोजी संप सुरु केला. मराठी व हिंदी चित्रपटांचे मुहूर्त, शूटिंग, गीत, संगीत रेकॉर्डिंग, सिटींग्ज, डबिंग, प्रदर्शन, प्रीमियर, पार्ट्या असे सगळेच 'संपावर' गेले आणि आम्हा सिने पत्रकारांना या ग्लॅमरच्या
जगाचा अगदी वेगळाच 'चेहरा' पाह्यचा योग आला.
सगळेच कसे चिडीचूप झाले. चित्रपटगृहातील

तिकीट दरावरील मनोरंजन कर कमी करावा, इतर अनेक राज्यांत तो कमीच आहे, व्हिडिओ चोरीला आळा बसावा अशा अनेक मागण्यांसाठी 'पडद्यावरचे असंख्य स्टार' चक्क मागण्यांसाठी रस्त्यावर मोर्चा काढू लागले, दक्षिण मुंबईतील 'ऑपेरा हाऊस' या चित्रपटगृहापासून हा मोर्चा राजभवनला गेला. देव आनंद, राजेंद्रकुमारपासून असंख्य स्टार त्यात सहभागी झाले. एकाद्या कधीही न पडणाऱ्या स्वप्नापेक्षाही हे खूपच मोठे वास्तव होते. याचे रिपोर्टिंग करणे जास्त अवघड

होते, याचे कारण ही 'वलयांकित' जगातील माणसे खरंच असे काही करतील अशी कोणीही कधी साधी कल्पनाही केली नव्हती. बरं, राज्य शासनाकडून काहीच आश्वासन मिळत नव्हते आणि हा 'चित्रपटसृष्टीचा बंद' देखिल मिटत नव्हता. एकेक दिवस वाढत होता. याच चित्रपट कलाकारांनी गिरगाव चौपाटीवर एक जाहीर सभाही घेतली. राजेश खन्ना, सनी देओल इत्यादींची भाषणे मूळ मुद्द्याला सोडून होती हेदेखील आठवतयं आणि अशातच या चळवळीत(?) एकाच व्यासपीठावर व्ही.शांताराम, दिलीपकुमार व लता मंगेशकर एकत्र येण्याचा योग आला. माझ्या सिनेपत्रकारीतेचा हा सुरुवातीचा काळ असल्याने तर या तिघांना यानिमित्त एकत्र

पाहणे, ऐकणे व अनुभवणे हे विशेषच रोमांचक होते. तिघांचेही बंदला समर्थन होतेच. ते स्वाभाविकही होतेच! आणि या तिघांनाही चित्रपट या माध्यम व व्यवसायाबद्दल कायमच विशेष आस्था असणे यात आश्चर्य नाही. तिघांकडेही या क्षेत्रातील दीर्घानुभव! या प्रत्येकाचे समाजात मानाचे स्थान व त्यांनीही समाजाला बरेच काही दिलेय. या तिघांचेही पडद्यापलिकडे जाऊन प्रेक्षकांशी भावनिक नाते जुळलयं. विविध स्तरावर त्याचा स्वीकार करता येईल. म्हणूनच तर हे तिघेही एकत्र येण्याचा हा क्षण विशेष मोलाचा....अरे हो, ज्या निमित्त हे तिघे एकत्र येण्याचा योग जुळून आला तो चित्रपटसृष्टीचा बंद अखेर १० नोव्हेंबर रोजी मिटला! पण एक चांगली आठवण देणारा ठरला! व्ही. शांताराम यांची वैशिष्ट्य अनेक! 'पिंजरा' या चित्रपटासाठी लता मंगेशकर यांनी 'दे रे कान्हा चोळी लुगडी..' हे एकमेव गाणे गायले तेव्हाचा हा किस्सा. हे जगदीश खेबूडकर यांनी लिहिलेले गाणे राम कदम यांनी संगीतबध्द केले आहे. या गाण्याचे रेकॉर्डिंग

करुन लता मंगेशकर यांना अमेरिका दौरावर जायचे होते. त्यानुसारच त्यांनी या गाण्याच्या रेकॉर्डिंगची तारीख निश्चित केली. पण नेमक्या त्याच वेळी राम कदम यांना मिरजेच्या मीरासाबच्या पीराजवळ त्याने मागून घेतलेला एक नवस फेडण्यासाठी मिरजला जायचं होतं. तसे त्यांनी व्ही. शांताराम यांना सांगितले. पण व्ही शांताराम यांना हे मान्य नव्हते. लता मंगेशकर यांनी दिलेली तारीख आपण बदलायची नाही असे व्ही शांताराम यांचे म्हणणे होते. ते राम कदम यांना म्हणाले, नवस विसरा आणि रेकॉर्डिंगचे बघा.... ही गोष्ट लता मंगेशकर यांना समजली आणि त्यांनी आपला अमेरिका दौरा राम कदम यांच्या नवस फेडायच्या आड येऊ नये म्हणून आपला दौरा काही दिवस पुढे ढकलला आणि राम कदम यांना हवी ती तारीख दिली!

पिंजरानंतर व्ही.शांताराम यांनी 'चानी', 'झंझार' या चित्रपटांचे दिग्दर्शन केले.

चित्रपती व्ही शांताराम यांनी चाळीसच्या दशकातच एकाच वेळेस मराठी व हिंदी अशा दोन्ही भाषेत चित्रपट निर्मिती केली. त्यामागचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, आपल्या चित्रपटातील सामाजिक आशय अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचावा. हे चित्रपट होते, १९३७ सालचा 'कुंकू' (हिंदीत 'दुनिया न माने), १९३९ सालचा 'माणूस' (हिंदीत 'आदमी'), १९४१ सालचा 'शेजारी' (हिंदीत 'पडोसी'). यातील 'शेजारी' या चित्रपटाबाबत

काही गोष्टी आवर्जून सांगायला हव्यात. व्ही. शांताराम याना ही कथा सुचली होती प्रभातच्या पाच भागिदारांपैकी दामले

आणि फत्तेलाल यांच्या मैत्रीतून. दामले हिंदू होते तर फत्तेलाल मुसलमान. पण त्या दोघांत जिवाभावाची मैत्री होती. आणि ही मैत्रीच या कथेचा जीव होता. असे विषय जास्तीत जास्त रसिकांपर्यंत पोहचावेत असे चित्रपती व्ही.शांताराम यांना मनोमन वाटत असे.

आज एकाच वेळेस दोन अथवा अधिक भाषेतील चित्रपट निर्माण करण्याचा ट्रेण्ड असला तरी व्ही.शांताराम यांनी फार पूर्वीच त्यात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

मी मिडियात आल्यावर जुन्या काळातील अनेक सिनेमावाल्यांना आपण निदान प्रत्यक्षात पहावे, जमल्यास भेटावे, शक्य असेल तर मुलाखत करावी असे मला कायमच वाटे आणि विजय आनंद, मनमोहन देसाई, राज खोसला, प्रकाश मेहरा, देव आनंद यांच्या भेटीने ते साध्यही झाले. व्ही.शांताराम, राज कपूर, दिलीपकुमार यांचे प्रत्यक्षात दर्शन घडले. (सिनेपत्रकारीतेने मला बरेच काही दिले, त्यात हे फारच मौल्यवान). राजकमल कलामंदिर (युथ विंग) च्या

किरण शांताराम निर्मित व सचिन पिळगावकर दिग्दर्शित "अशी ही बनवाबनवी" या सर्वकालीन तरुण आणि सुपरहिट चित्रपटाचा रौप्य महोत्सवी सोहळा 'राजकमल कलामंदिर' स्टुडिओत रंगला तर चित्रपटाने 'प्लाझा' चित्रपटगृहात पन्नास आठवड्यांचा मुक्काम केल्यावरचा सुवर्ण महोत्सवी सोहळा जुहूतील एका पंचतारांकित हॉटेलमधील स्विमिंग पूल साईटवर रंगला तेव्हा व्ही.शांताराम आणि दिलीपकुमार प्रमुख पाहुणे होते. अतिशय आदर ठेवावा अशा या चित्रपटसृष्टीतील दोन महनीय व्यक्ती. त्यांना एकाच सोहळ्यात पाहणे, ऐकणे, अनुभवणे आणि डोळ्यात साठवून ठेवण्याचे भाग्य मला लाभलयं. व्ही.शांताराम यांच्याशी यावेळेस औपचारिक भेटही घेतली. पण मी बोलणार काय?

चित्रपती व्ही.शांताराम यांच्या प्रगती पुस्तकात अशा अनेक अगणित सकारात्मक गोष्टी आहेत. त्यातील काहींवर हा फोकस! आजही राजकमल कलामंदिर स्टुडिओत पाऊल टाकताच व्ही.शांताराम (जन्म १८ नोव्हेंबर १९०१.

मृत्यू ३० ऑक्टोबर १९९०) यांचे अस्तित्व नक्कीच जाणवते! अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आलेल्या (त्यातील अनेक मानाचे पुरस्कार राजकमलमध्ये अतिशय व्यवस्थित मांडण्यात आले आहेत!) या व्यक्तिमत्वाचे मोठेपण चित्रपटाच्या विशाल

पडद्यासारखेच उत्तुंग आहे...! चित्रपती डॉ. व्ही. शांताराम! (डॉ. शांताराम राजाराम वनकुद्रे) यांचे १२५वे जयंती वर्ष <u>१८ नोव्हेंबर २०२५</u> रोजी सुरु झाले आहे. या १२५व्या जयंतीवर्षाच्या निमित्ताने डॉ. व्ही. शांताराम यांची कारकीर्द जिथे बहरली



त्या कोल्हापूर, पुणे आणि मुंबई या शहरांमध्ये वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. जानेवारी मध्ये मुंबई व ठाणे येथे होणाऱ्या आशियाई चित्रपट महोत्सवात डॉ. व्ही. शांताराम यांच्या चित्रपटांचा विशेष विभाग असणार आहे तसेच प्रभात चित्र मंडळ आणि फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ इंडिया या संस्था डॉ. व्ही. शांताराम यांच्या चित्रपटांचे विशेष शो आयोजित करण्यात आले होते. गोव्यात आयोजित केल्या गेलैल्या भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात डॉ. व्ही. शांताराम निर्मित 'डॉक्टर कोटनीस की अमर कहानी (१९४६)' हा चित्रपट दाखवण्यात आला आणि महोत्सवाच्या सांगता समारंभात डॉ. व्ही. शांतारामांचे चित्र असलेल्या पोस्ट-स्टॅम्पचे अनावरण करण्यात आले!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

<u>लेख क्र. ९२</u>

‘सरफरोश’ @ पंचविशी पार!
‘मै अपने मुल्क को अपना घर समजता हूं....!’

नव्वदच्या दशकात शेजारी राष्ट्रांतून काही गझल गायक भारतात आपल्या गझल गायकीच्या कार्यक्रमासाठी/ मैफिलीसाठी येत आणि मुंबई, दिल्ली, जयपूर, हैदराबाद इत्यादी अनेक शहरांत त्यांचे कार्यक्रम होत. नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्ग त्यांचा मोठाच श्रोता! त्यांच्या गझल गायकीने अनेक संगीत शौकीन मंत्रमुग्ध होत. 'गुलफाम हसन' - काल्पनिक नाव (नसिरुद्दीन शहा) देखील असाच गझल गायक पाकिस्तानातून भारतात येऊन लोकप्रिय झालेला!

पण त्याचा तो 'मुखवटा' असतो. त्याचा खरा चेहरा वेगळाच असतो! त्याने येथे राजस्थानच्या सीमाभागातून पाकिस्तानच्या शस्त्रास्त्रांना भारतात आणण्याचा डाव सुरु ठेवलेला असतो. त्यात उंटाचा अतिशय चलाखीने वापर करण्यात येत असतो! एक वरिष्ठ पोलीस निरीक्षक 'अजयसिंग राठोड' (आमिर खान) हे सगळे हुशारीने विणलेले जाळे, चलाख गुन्हेगारी कशा पध्दतीने उध्वस्त करतो याची उत्तरोत्तर रंगत जाणारी क्लासिक कलाकृती म्हणजे, जॉन मॅथ्यूज मथान दिग्दर्शित "सरफरोश". (मुंबईत रिलीज ३० एप्रिल १९९९) च्या प्रदर्शनास खणखणीत सत्तावीस वर्षे पूर्ण झाली आहेत. देशभक्तीवरील एक वेगळा चित्रपट म्हणूनही हा चित्रपट ओळखला जातो. आजही हा चित्रपट तेवढाच प्रभावी वाटतो. आपल्याला गुंतवून ठेवतो. कितीही वेळा हा चित्रपट पाहिला तरी तोच प्रभाव. याचं कारण, त्याची वेगळी 'थीम' आणि सतत 'टर्न आणि ट्विस्ट' असलेली पटकथा व त्याची मांडणी! चित्रपटाची सुरुवात

अजय आणि सीमा (सोनाली बेन्द्रे) यांच्या नवी दिल्लीतील कॉलेजमधील प्रेमाच्या गोड गोड गोष्टीने होते. त्यात प्रेमगीतांचा गोडवा, शिडकावा मिळतो. आणि एकदा अचानक अजय हा पोलीस असल्याचे समजताच सीमाला पडद्यावर आणि आपल्याला बसल्या जागी धक्का बसतो. चित्रपट येथून जे वळण घेतो ते अनेक गोष्टींसह रोमांचकता, उत्सुकता वाढत वाढत नेतो...!

दिग्दर्शक जॉन मॅथ्यूज मथानचा हा पहिलाच चित्रपट आणि त्याने प्रस्थापितांना चांगलाच धक्का दिला. त्याची गरज असतेच! अशा कसदार कलाकृतीमागे अतिशय छोट्या छोट्या गोष्टींसह बरीच मेहनत असते. जॉन मॅथ्यूज मथानचे प्रगती पुस्तक कौतुकास्पद आहे. रिचर्ड ॲटनबरो दिग्दर्शित 'गांधी' (१९८२) च्या वेळेस जॉन सेकंड युनिट सहाय्यक दिग्दर्शक होता. मग "आक्रोश"च्या वेळेस दिग्दर्शक गोविंद निहलानी यांचा सहाय्यक दिग्दर्शक होता. त्यानंतर त्याने जाहिरातपटांवर लक्ष केंद्रित केले. अवघ्या

काही सेकंदात एकाद्या उत्पादनाची अतिशय प्रभावी जाहिरात करणे यात बरीच कल्पकता, कसब व कौशल्य असते. अशातच १९९२\९३ साली मुंबईत जातीय दंगल आणि मग बॉम्बस्फोट झाले. सर्वांसाठीच हा चिंतेचा विषय होता. त्याच सुमारास जॉन मॅथ्यूज जाहिरातपटाच्या कामानिमित्त दिल्लीत गेला असता संध्याकाळी खूपच लवकर होत असलेल्या शांततेने, त्यातील अनामिक तणावाने तो अंतर्मुख झाला. या सगळ्यातून त्याला कथाआशय सुचत गेला. तो डेव्हलप करायला वेळ गेला. त्या काळात जॉन मॅथ्यूज गाडीने रस्ता मार्गाने उत्तर भारतात भरपूर फिरला. त्यातून अनेक संदर्भ सापडत गेले. जॉन वास्तववादी चित्रपटाचा विलक्षण चाहता. मनोरंजनाची चौकट सांभाळून आपणही वास्तवाच्या जवळ जाणारा चित्रपट निर्माण करावा हे त्याने पक्के ठरवले होते. १९९५ साली त्याने आमिर खान बराच बिझी असताना त्याची अर्ध्या तासाची भेट मागितली. आमिरची त्या काळात रोमॅन्टीक हीरो अशी इमेज होती.

त्याला 'सरफरोश' एक नवीन रुपाची संधी होती. गोष्ट ऐकताना आमिरने जॉन मॅथ्यूजला तीन तास दिले. सोनाली बेन्द्रेने जॉन मॅथ्यूजच्या अनेक जाहिरातीसाठी 'मॉडेलिंग' केले असल्याने तिची निवड पक्की होती. जॉन मॅथ्यूजनेच तिचं प्रवीण निश्चलला 'इंग्लिश बाबू देशी मेम" साठी नाव सुचवले आणि ती मॉडेलिंगकडून चित्रपटात आली. शाहरुख खान त्यात तिचा नायक होता. तो चित्रपट सेटवर जाईपर्यंत सोनालीने भरत रंगाचारी दिग्दर्शित 'टक्कर' (सुनील शेट्टी व नसिरुद्दीन शहासोबत) आणि के. रवि शंकर दिग्दर्शित 'आग' (गोविंदासोबत) साईन केले. चित्रपट निर्मितीत 'पडद्यामागे' अशा अनेक गोष्टी घडत बिघडत असतात. त्या खूप रंजक असतात. प्रश्न होता, आमिरपेक्षा सोनाली उंच तर ठरणार नाही? ते तर उघडपणे दिसतेय. पडद्यावरही तसेच दिसून कसे चालेल? पब्लिकचं फार लक्ष असते. 'सरफरोश' रिलीज झाल्यावर सोनालीच्या मुलाखतीचा मला योग आला असता तिने सांगितलं, ते सर्वांच्याच लक्षात आले. म्हणून

एकदा जॉनच्या घरच्या पार्टीत आम्हा दोघांना जवळ उभे करुन कसे दिसतेय, उंचीत फरक आहे का हे अजमावून पाहिलं असता, तसा काही विशेष फरक जाणवत नव्हता आणि मग चित्रपट पाहतानाही तसा उंचीतील फरक वगैरे दिसत नाही.

जॉन मॅथ्यूजने व्यक्तीरेखेनुसार एकेक कलाकार निवडायला सुरुवात केली. नसिरुद्दीन शहाला पोलीस इन्स्पेक्टर सलीमच्या भूमिकेसाठी विचारले असता त्याने म्हटले, नको. कारण आपण अशी भूमिका साकारलीय. काही वेगळे असेल तर सांग. 'गुलफाम हसन'ची भूमिका मग त्याला मिळाली. ती त्याने उत्तम वठवलीय. बराच काळ त्याचा संशय येत नाही हेच तर विशेष! इन्स्पेक्टर सलीमसाठी आमिरनेच मुकेश ऋषिचे नाव सुचवले. आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित "बाझी" मध्ये या दोघांनी एकत्र काम केले होते. वल्लभ व्यास (मेजर अस्लम बेग), अखिलेन्द्र मिश्रा (मिर्ची सेठ), मकरंद देशपांडे (शिवा), मनोज जोशी (एस. पी. बैजू),

प्रदीप रावत (सुल्तान), राजेश जोशी (बाला ठाकूर), स्मिता जयकर (अजयची आई), आकाश खुराना (अजयचे वडील) तसेच नवाजुद्दीन सिद्दीकी (तोपर्यंत त्याला ओळख मिळाली नव्हती), सुरेखा सिकरी, सुकन्या मोने, जयवंत वाडकर, अशोक लोखंडे, सुनील शेंडे, हिमायत अली, डिंपल इनामदार इत्यादींच्या भूमिका आहेत. गोविंद नामदेव यांनी साकारलेली वीरन ही व्यक्तीरेखा वीरप्पनची आठवण करुन देणारी होती!

चित्रपटाने निर्मितीवस्थेत बराच काळ घेतला पण कलाकृती अतिशय स्फोटक आणि प्रभावी अशी पडद्यावर आली. तेच तर महत्वाचे असते. चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दीवरुन त्यात काय आहे अथवा असावे याचे आकलन होत नव्हते. तोपर्यंत आगामी चित्रपटाबाबत अवाजवी मिडिया हाईप दिला जात नसे. चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण होईल असे वातावरण तयार होई आणि त्यात लोकप्रिय गीत संगीताची साथ मिळत असे. (त्या काळात रामगोपाल वर्मा दिग्दर्शित

'सत्या', शेखर कपूर दिग्दर्शित 'बॅण्डिक्ट क्वीन' या चित्रपटांबाबत अगदी असेच घडले. चित्रपट जास्त सांगेल वा बोलेल यावर भिस्त होती. आता नवीन चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच त्याबद्दल इतकं नि असे सांगितले जाते की त्या चित्रपटाचे तिकीट काढून थिएटरमध्ये जाण्याची गरजच राहत नाही.) सेन्सॉरने चित्रपटातील पाकिस्तान, आयएसआय या उल्लेखांना हरकत घेतली होती. पण ते कापले तर चित्रपटाचा मूळ हेतू बोथट होईल असे जॉन मॅथ्यूजने पटवून दिले. येथे दिग्दर्शक दिसतो!

चित्रपट प्रदर्शनास सज्ज होत असतानाच त्याच्या गाण्याची ध्वनिफीत रसिकांसमोर आली तीच गाणी लोकप्रिय झाली. विशेषत: 'होशवालो को खबर क्या..' ही 'नीदा फाजली'ची जगजित सिंग यांनी गायलेली गझल अप्रतिम. संगीत जतिन-ललितचे! या चित्रपटातील 'इस दीवाने लडके को..' (अमितकुमार व अलका याज्ञिक), 'जो हाल दिलका..' (कुमार शानू व अलका याज्ञिक), 'ये जवानी

हद कर दे..' (कविता कृष्णमूर्ती) ही गाणी समीरने लिहिली होती. 'जिंदगी मौत ना बन जाए..' हे 'इसरार अंसानी' लिखित गाणे सोनू निगम व रुपकुमार राठोड यांनी गायले. या गाण्याने चित्रपटाचा देशभक्तीचा परिणाम आणखीन गडद होतो! प्रभावी व बोलके संवाद हेदेखील या चित्रपटाचे वैशिष्ट्य. 'मै अपने मुल्क को अपना घर समजता हू', 'क्या ठाकूर तेरेको कितनी बार बुलाया तू आता नही' इत्यादी! पण सर्वाधिक महत्वाचा ठरला इन्स्पेक्टर सलीमचा संवाद, 'फिर कभी किसी सलीम को मत कहना... ये मुल्क उसका नहीं..' मुकेश ऋषि या एका संवादाने जास्त फोकसमध्ये आला (प्रियदर्शन दिग्दर्शित 'गर्दीश', आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'बाझी' आणि हा 'सरफरोश' हे त्याला चित्रपटसृष्टीत स्थिरावण्या तील महत्वाचे टप्पे!) खरं तर या भूमिकेसाठी अमरीश पुरी अथवा नाना पाटेकर यांची निवड होऊ शकली असती असे त्याला वाटले. पण आपली झाली म्हणजेच ही भूमिका अधिकच वेधक करण्यातील आपली

जबाबदारी वाढली. या भूमिकेचा अनुभव त्याला बरेच काही देणारा ठरला. सिनेमा हिट झाल्यावर हिंदीत बऱ्याच ऑफर येतील असं अजिबात झाले नाही. दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटांच्या मात्र ऑफर आल्या.

चित्रपट असा व इतका हिट होईल याची जॉन मॅथ्यूज मथानला खात्री नव्हतीच. चित्रपटाचे कौतुक होईल, बऱ्यापैकी यश प्राप्त होईल असे वाटले होते. पब्लिकचा 'रिस्पॉन्स' पाहण्यास तो दक्षिण मध्य मुंबईतील मराठा मंदिर चित्रपटगृहात गेला असता तो विलक्षण सुखावला. हाऊसफुल्ल गर्दी चित्रपटात गुंतली होती. टाळ्या आणि शिट्यांनी प्रतिसाद देत होती. आणि अशातच कारगिल युद्धाने वातावरण बदलून गेले. 'सरफरोश 'मधील अनेक गोष्टी त्याच युद्धात जाणीव करुन देत होत्या.

हे युद्ध आपण जिंकले, तसेच हा चित्रपटही रसिकांनी आपलासा केला. देशभक्तीवरील चित्रपटात पूर्वीचा मसालेदार मनोरंजनाचा फंडा यात नव्हता. एव्हाना

दिग्दर्शक व रसिकांचीही नवीन पिढी आली होती. ती अधिक चौकस होती. त्यांना असेच काही वेगळे हवे होते. 'सरफरोश' म्हणूनच ग्रेट कलाकृती ठरली. याच चित्रपटापासून आमिर खानने चित्रपट निवडीत चोखंदळपणा आणि संख्येत नेमकेपणा आणला (असं म्हणतात) सोनाली बेन्द्रेसाठी हे यश महत्वाचे ठरले. तिने ग्लॅमरस भूमिकाच साकारलीय पण चित्रपट वेगळा होता हे जास्त महत्वाचे!

'सरफरोश' ची प्रसार माध्यमातून आणि चित्रपट रसिकांत भरपूर चर्चा झाली ते यश वेगळेच. या चित्रपटाची एक वेगळीच आठवण. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी महालक्ष्मीच्या फेमस स्टुडिओतील मिनी थिएटरमधील 'शो'च्या वेळेस तासाभरातच अचानक वेगळ्याच घटना दिसू लागल्या....थोड्याच वेळात लक्षात आले की, मध्यंतरनंतरचे रिळ मध्येच लागलयं....चूक दुरुस्त करुन मग सिनेमा पुढे गेला. एक आठवण अशीही!

© दिलीप ठाकूर

(राम प्रहर - झूम प्रहर)

♥

<u>लेख क्र. ९३</u>

'चोर मचाये शोर'@ चक्क पन्नाशीपार!
'ले जाऐंगे.. दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे..!'

गरीब नायक विजय (शशी कपूर) आणि श्रीमंत नायिका रेखा (मुमताज) यांच्या निस्सीम प्रेमाला प्रेयसीच्या खडूस पित्याचा तीव्र विरोध! (शशी कपूरच काय कोणताही कपूर गरीब वाटू शकेल काय? कपूर म्हणजे श्रीमंत खानदान हे घट्ट समीकरण! शशी कपूर तर ऐटबाज! त्याचा चेहराच राजेशाही खानदानी थाटाचा!) अशा परिस्थितीत नायिकेच्या पित्याला डिवचण्यासाठी नायक व नायिकेचे

मित्र मैत्रिणी नाचतात गातात! 'ले जाऐंगे...ले जाऐंगे दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे..!' त्या नायिकेचा पिता यावरुन आणखीनच खवळतो आणि एका खोट्या प्रकरणात नायकाला जेलमध्ये टाकतो! तेथे त्याची राजू उस्ताद इत्यादी कैद्यांबरोबर गैरसमजातून झटापट होते. निरपराध नायक हतबल होऊन एका रात्री कैद्याच्या रुपात गातो.. 'घुंगरु की तरह बजता ही रहा हू मै...'

त्याच्या (खरं तर किशोरकुमारच्या) आवाजातील दर्द ऐकून भलुआ (असरानी), कलुआ (तरुण घोष) आणि राजू उस्ताद (डॅनी डेन्झोपा) यांना गहिवरून येते! ते विजयला मदत करायचे ठरवतात आणि चौघे पध्दतशीर योजनेनुसार जेल फोडून पळतात. आपणास शिक्षा झाली तरी आपली प्रेयसी गप्प या रागातून विजय रेखाला भेटायला येतो. तेव्हा त्याचा गैरसमज दूर होतो आणि हे दोघे आणि ते तिघे कैदी असे पाचजण एका गावात जाऊन राहतात. त्या गावातील जनतेचे मन जिंकतात, गावात सुधारणा करतात, गावच्या

शत्रूचा पाडाव करतात वगैरे वगैरे..! एन. एन. सिप्पी निर्मित व अशोक रॉय दिग्दर्शित "चोर मचाये शोर" (मुंबईत रिलीज १७ मार्च १९७४) ची ही गोष्ट! या गोष्टीला चक्क सत्तावीस वर्षे उलटली की हो! पिक्चर हिट झाले होते! मुंबईत अलंकार थिएटरमध्ये रौप्य महोत्सव साजरा झाला!

आज "यू ट्यूब"वर हा चित्रपट.. उपलब्ध माहितीनुसार हजारोहून जास्त रसिकांनी HD, 4K वगैरे स्वरूपात तो अगदी मनमुराद "एन्जॉय" केला आहे! मला आठवतंय, तो चित्रपट "थिएटर" मध्ये सामान्य रसिकांनी बहुसंख्येने खचितच "एन्जॉय" केला असावा, असं वाटतंय खरं! सिनेमा आणि त्यातली गाणी हा एकंदर "यू.एस.पी." असावा! (आम्ही तेव्हा वयाने केवळ चौदा-पंधरा वर्षाचे होतो यार!) तरीही थोरामोठ्यांच्या गप्पांमधून.. या सिनेमाविषयी बरंच काही ऐकायला मिळत असे! मुख्य म्हणजे "गाणी"! ती "रेडिओवर" सतत वाजत असत म्हणून! असो!! "यू ट्यूब"वर हा पिक्चर एन्जॉय करताना तुम्ही त्याची तेवढी

गाणीच पहाल आणि उर्वरित चित्रपट फास्ट फॉरर्वड कराल. कारण गोष्ट यथातथाच वाटेल. त्या काळात अशा 'स्टोरीज' पब्लिकला आवडत. एकाद्या गावात जावून तेथे सुधारणा करणे, त्या गावाला छळणारा खलनायकाचा पाडाव करणे आणि गावकऱ्यांचे मन जिंकणे अशा गोष्टी अनेक चित्रपटांत दिसत. फक्त त्याचं कव्हर वेगळे असे. नरेंद्र बेदी दिग्दर्शित 'खोटे सिक्के' वगैरे अनेक चित्रपट तसेच होते. पटकथेत कोणता मसाला घालून चित्रपट कसा रंजक केला जातो हे महत्वाचे असे. 'चोर मचाये शोर' चे लेखन ध्रुव चटर्जी आणि एस. एम. अब्बास यांचे. मनोरंजनाची भट्टी छानच जमलेली.

शशी कपूर व मुमताज ही जोडी याच पिक्चरमध्ये पहिल्यांदाच एकत्र आली. शशी कपूरने राज खोसला दिग्दर्शित 'दो रास्ते' (१९६९) आणि मनमोहन देसाई दिग्दर्शित 'सच्चा झूठा' (१९७०) या चित्रपटांच्या वेळेस मुमताजला आपली नायिका म्हणून स्वीकारण्यास चक्क नकार दिला होता. असा किस्सा प्रसिद्ध आहे. आपली

भूमिका असलेल्या श्रीधर दिग्दर्शित 'प्यार किये जा' (१९६६) मध्ये मेहमूदची तर 'फौलाद' मध्ये दारा सिंगची नायिका असलेल्या मुमताजला आपली नायिका म्हणून स्वीकारण्यास शशी कपूरचे मन तयार होत नव्हते. चित्रपटसृष्टीचे असेही एक अंतरंग! तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, मुमताजला आपली नायिका म्हणून स्वीकारण्यास जितेंद्र, धर्मेंद्रही सुरुवातीस तयार नव्हते. तिने ज्युनियर डान्सरपासून सुरु केलेला प्रवास सहनायिकेच्या भूमिकेतून पुढे जात असल्याचा हा टप्पा होता. चाणक्य दिग्दर्शित 'राम और श्याम' मध्ये ती दोनपैकी एका दिलीप कुमारची श्यामची नायिका होती (प्रमुख नायिका वहिदा रेहमान) हा मुमताजच्या वाटचालीतील महत्वाचा क्षण. विजय आनंद दिग्दर्शित 'तेरे मेरे सपने' (१९७२) आणि देव आनंद दिग्दर्शित 'हरे राम हरे कृष्ण' (१९७२) मध्ये देव आनंदची नायिका म्हणून मुमताजची निवड होताच तिच्या मेहनत, गुणवत्ता, नृत्य व सौंदर्याचे महत्व अनेकांना पटले. मुमताजने एका मुलाखतीत चक्क

म्हटलं, आपणास नायिका म्हणून का स्वीकारत नाही हे शशी कपूरला विचारण्यास ती मेहबूब स्टुडिओतही गेली होती. असा बाणा हवा!

शशी कपूरने 'चोर मचाये शोर' आणि राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी' (रिलीज ७ मार्च १९७५) या चित्रपटात मुमताजला नायिका म्हणून स्वीकारले. 'प्रेम कहानी' हा म्युझिकल प्रेम त्रिकोण. राजेश खन्ना आणखीन एक प्रेमिक नायक. याच्या मुहूर्ताच्या वेळेस चक्क मौशमी चटर्जी नायिका होती. राजेश खन्नाच्या आग्रहाखातर मुमताज या चित्रपटात आली आणि मग लग्न करुन तिने चित्रपटसृष्टीबाहेर पडण्याचा निर्णय घेतला..!

'चोर मचाये शोर' हा एन. एन. सिप्पी या प्रॉडक्शन्सचा चित्रपट. 'वह कौन थी?' वगैरे चित्रपटानंतरचा त्यांचा 'चोर मचाये शोर' आणि याच्या यशानंतर शशी कपूर, असरानी, डॅनी यांना घेऊन सी. पी. दीक्षित दिग्दर्शित 'फकिरा' ची निर्मिती! नायिका शबाना आझमी! त्याशिवाय 'कालीचरण'

व 'मेरी जंग' (दिग्दर्शक सुभाष घई), 'देवता' (एस. रामनाथन), 'सरगम' (के. विश्वनाथ), 'घर' (माणिक चटर्जी), 'फिर वही रात' (डॅनी डेन्झोप्पा) वगैरे चित्रपटांची निर्मिती केली. त्यांची स्वतःची चित्रपट वितरण व्यवस्थाही होती. जनता वितरण व सफायर रिलीज या नावाची! मला आठवतय 'नाझ' इमारतीत त्यांचे ऑफिस होते..!

'चोर मचाये शोर 'चे दिग्दर्शक अशोक रॉय यांनी 'कलाबाज' (देव आनंद व झीनत अमान जोडी होती), 'हिरालाल पन्नालाल', 'कसम खून की', 'एक और एक ग्यारह' इत्यादी चित्रपटांचे दिग्दर्शन केले! मात्र दुर्दैवाने एक

सर्वसाधारण क्षमतेचा दिग्दर्शक, हीच त्याची ओळख राहिली. असे दिग्दर्शक सर्व काळात असतात.

'चोर मचाये शोर' च्या प्रदर्शनाच्या वेळेस शशी कपूर..मनोजकुमार निर्मित/ दिग्दर्शित 'रोटी कपडा और मकान' (रिलीज १८ ऑक्टोबर १९७४) च्या शेवटच्या चित्रिकरणसत्रात भाग घेत होता आणि त्याला मनोमन वाटत होते, आपल्याला हिट चित्रपटाची आवश्यकता आहे. आपले सोलो हिरोचे चित्रपट अधिक प्रमाणात लोकप्रिय व्हावेत. यश चोप्रा दिग्दर्शित 'वक्त'च्या यशात बरेच वाटेकरी होते. सुरज प्रकाश दिग्दर्शित 'जब जब फुल खिले' सुपरहिट होता! तसेच यश त्याला हवे होते. मनोजकुमारने त्याची ही इच्छा ओळखून त्याला शिरडीला साईबाबांच्या दर्शनासाठी जाण्याचे सुचवले. त्यानुसार शशी कपूर शिर्डीला गेला, त्याच दिवशी नेमका परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार'चा मुहूर्त

होता. चित्रपती व्ही. शांताराम, दिग्दर्शक विजय आनंद असे अनेक मान्यवर 'दीवार'च्या मुहूर्ताला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित असतानाच शशी कपूर मात्र हजर राहू शकला नव्हता. त्याचीही एक बातमी झाली.

'चोर मचाये शोर 'ची अशीही एक विशेष आठवण! चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय. 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे..' (आशा भोसले, किशोरकुमार व कोरस), 'एक डाल पर तोता बोले..' (लता मंगेशकर व मोहम्मद रफी) ही गाणी इंद्रजितसिंग तुलसी यांनी लिहिलेली! तर 'घुंगरु की तरह..' (किशोरकुमार), 'पांव मे डोरी..' (आशा भोसले व मोहम्मद रफी), 'आगरे से घाघरो..' (आशा भोसले) ही गाणी रवींद्र जैन यांची! चित्रपटाला संगीत रवींद्र जैन यांचे. छायाचित्रण कार के. एच. कापडिया तर संकलन वामन गुरु यांचे. 'चोर मचाये शोर' आणखीन एका गोष्टीसाठी कायमच फोकसमध्ये! यशराज फिल्म निर्मित व आदित्य चोप्रा दिग्दर्शित 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' (१९९५) च्या दिवाळीत प्रदर्शित झालेला

हा चित्रपट आजही दक्षिण मध्य मुंबईतील 'मराठा मंदिर' चित्रपटगृहात मॅटीनी शोला सुरुच आहे.) हा बहुचर्चित चित्रपट. 'चोर मचाये शोर 'च्या सुपरहिट गाण्याचा मुखडा एका माईलस्टोन चित्रपटाचे नाव आहे तर मग आणखीन काय हवे? 'ले जाऐंगे ले जाऐंगे दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे...' गाणे लिहिताना असा एकादा भन्नाट विक्रम होईल अशी अपेक्षा ठेवली गेली असेल असे अजिबात वाटत नाही, यातच सगळे काही आले ...

दिग्दर्शक डेव्हिड धवनचाही 'चोर मचाये शोर' (२००३) नावाचा पिक्चर आहे. पडद्यावर आला तोच गेला देखिल! बॉबी देओल (डबल रोल मध्ये होता), शिल्पा शेट्टी, बिपाशा

बासू, परेश रावल यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचे केवळ नामसाम्य आहे इतकेच. मूळ चित्रपटाची गंमत यात अजिबात नाही. मूळ चित्रपटात स्टाईलीश शशी कपूर, ग्लॅमरस मुमताज, विनोदाच्या टायमिंगचा असरानी आणि फिट्ट असा डॅनी डेन्झोप्पा आणि झक्कास गीत संगीत व नृत्य होते. त्यात मनोरंजनाची भट्टी छानच जमली होती....!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ९४

'काला पानी' @ ६८ वर्षे
रहस्यरंजकता पुन:पुन्हा एन्जॉय करावी..!

विजय आनंदच्या दिग्दर्शनातील देव आनंद म्हणताक्षणीच चित्रपट रसिकांच्या किमान तीन पिढ्यांच्या डोळ्यासमोर 'नौ दो ग्यारह' (१९५७) पासूनचे या जोडीचे अनेक चित्रपट येताना देव आनंदचं रुपडं, स्टाईल, इमेज, लोकप्रियता इतकेच नव्हे तर त्याच्या अभिनयातील मर्यादा हे सगळेच विचारात घेऊन विजय आनंदने त्याला 'तेरे घर के सामने', 'ज्वेल थीफ', 'जॉनी मेरा नाम' इत्यादीत कसा रुपेरी पडद्यावर साकारला आणि "गाईड"मध्ये त्याच्यातील

अभिनय क्षमताही दाखवली हे आले असेल. त्या काळातील अनेक चित्रपट रसिकांच्या एका पिढीतून पुढील पिढीत जात राहिले! राज खोसलाच्या दिग्दर्शनातील देव आनंद हाही बहुरंगी प्रवास! अगदी "मिलाप" (१९५५) पासूनचा. याच जोडीचा रहस्यरंजक चित्रपट "काला पानी" (मुंबईत रिलीज ९ मे १९५८) च्या प्रदर्शनास ६८ वर्षे झाली देखील. आजही त्याच्या लोकप्रिय गाण्यांची खुमारी कायम आहे. चित्रपटाची निर्मिती 'नवकेतन' फिल्म बॅनरखाली झालेली. "काला पानी"च्या कथा आशयात नायक करण मेहरा (देव आनंद) आपले तुरुंगात शिक्षा भोगत असलेले वडील कसे निरपराध आहेत याचा शोध घेतो.. असे मध्यवर्ती सूत्र आहे. करणला त्याची आई सांगते की त्याच्या लहानपणीच त्याच्या वडीलांचे निधन झाले. पण अमरला हे खरे वाटत नसते. तो या प्रकरणाचा शोध घ्यायचे ठरवतो आणि आपल्या पित्याच्या बाजूने साक्ष देणाऱ्यांचा शोध घेतो. त्यात त्याला पोलीस इन्स्पेक्टर मेहता भेटतो आणि या एकूणच प्रकरणाबाबत

एका डायरीतून बरीच माहिती मिळेल असे सांगतो. त्या डायरीचा शोध यावर रहस्यरंजकता खुलते. अमरची आशा (मधुबाला) हिच्याशी ओळख आणि मग प्रेम प्रकरण घडते. ती पत्रकार असते आणि ती अमरला बरीच मदत करते. चित्रपटाच्या अखेरीस सत्य बाहेर येते आणि अमरचे वडील जेलबाहेर येतात.

"काला पानी"च्या अनुभवाबद्दल नलिनी जयवंतनी एका मुलाखतीत म्हटलं होतं, या चित्रपटाचे शूटिंग देव आनंदने अतिशय झपाट्याने सुरु केले. गोरेगावच्या फिल्मीस्थान स्टुडिओत रात्रं दिवस अठ्ठावीस दिवस काम करीत त्याने बराचसा चित्रपट पूर्ण केला. राज खोसलांचे पेपरवर्कही उत्तम होते. देव आनंदच्या अथक काम करण्याच्या पध्दतीकडे पाहून नलिनी जयवंतही आश्चर्यचकित झाल्या. याच चित्रीकरणात नलिनी जयवंत यांच्यावरील बरीच दृश्य चित्रीत झाली! देव आनंदच्या शिस्तबद्ध काम करण्याच्या पध्दतीमुळे नलिनी जयवंतना

बरीच मेहनत करावी लागली तरी चित्रपटाच्या रशेस पाहिल्यावर आपल्या मेहनतीचे चीज झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या चित्रपटाच्या चित्रीकरण काळातच राज खोसला यांच्या मुलाचे निधन झाल्यावर आता काय करायचे असा प्रश्न निर्माण होताच देव आनंदने विजय आनंदकडे काही काळ जबाबदारी सोपवली. चित्रपटात किशोर साहू, प्रवीण पॉल, आगा, मुकरी, नासिर हुसेन, कृष्ण धवन, जानकीदास, मुमताज बेगम, हीरा सावंत यांच्याही भूमिका आहेत.

दिग्दर्शक राज खोसलांच्या चित्रपटातील गीत संगीत ही एक छान जमून येणारी गोष्ट. पटकथेत त्या गाण्यांना योग्य स्थान (गाण्यांसह चित्रपट पुढे सरकणे), गाणी ऐकावयास श्रवणीय आणि पडद्यावर पाह्यलाही आकर्षक!

'काला पानी'ची गाणी मजरुह सुल्तानपुरी यांची तर संगीत सचिन देव बर्मन यांचे! 'अच्छा जी मै हारी चलो मान..' गाण्यातील देव आनंद व मधुबाला यांच्यातील छेडछाड,

खट्याळपणा रंगतदार. 'दिलवाले अब तेरी गली तक..' गाण्यातील दोघांचे वेषांतर आणि नृत्यही लाजवाब. 'जब नाम-ए-मोहब्बत लेके..' (आशा भोसले), 'दिल लगाके कदर गयी प्यारे..' (आशा भोसले), 'हम बेखुदी मे तुमको पुकारे..' (मोहम्मद रफी) ही या चित्रपटातील गाणी! मूळ 'ब्लॅक अँड व्हाईट' होती, आता तर 'रंगीत' सुद्धा आहेत. चित्रपटांचा रंग काही वेगळाच आणि त्याचा दिग्दर्शक व छायाचित्रणकार खुबीने वापर करीत.

हा चित्रपट ए. जे. क्रोनिन (A. J. KRONIN) यांच्या 'बीयॉण्ड धिस प्लेस" या कादंबरीवर आधारित होते. त्याचे भारतीयकरण आनंद पॉल यांनी केले. ग. रा. कामत यांनी पटकथा लिहिली. त्यांची राज खोसला यांच्याशी छान जोडी जमली होती. (जोडीने 'मेरा साया', 'दो रास्ते', 'मेरा गाव मेरा देश' असे अनेक चित्रपट दिले.) तर संवाद भप्पी सोनी यांचे होते. कालांतराने ते दिग्दर्शक म्हणून कार्यरत झाले!

राज खोसला आणि देव आनंद पंजाबमधील गुरदासपुरचे. अर्थात बालपणीचे मित्र. दोघांचा मुंबईतील आणि चित्रपटसृष्टीतील प्रवास खूपच मोठा आणि वळणावळणाचा. देव आनंदनेच त्याला "बाजी"च्या वेळेस गुरुदत्तकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून संधी दिली. (आणि त्याचं गायक बनण्याचे स्वप्न मागे पडले. त्याने गायनात के. एल. सैगलचा आदर्श ठेवला होता. थोडीफार गायची संधीही मिळाली.) 'बाजी'नंतर 'जाल' व 'बाज' या चित्रपटांसाठी राज खोसला गुरुदत्तचा सहाय्यक दिग्दर्शक होता. निर्माता टी. आर. फतेहचंद यांनी त्याला "मिलाप" पासून स्वतंत्रपणे चित्रपट दिग्दर्शनाची संधी दिली. पहिल्याच दिग्दर्शनातील चित्रपटात अर्थात देव आनंद होताच, जोडीला गीताबाली! 'काला पानी' हा राज खोसला व देव आनंद जोडीचा 'सी. आय. डी.' व 'सोलहवा साल' नंतरचा चित्रपट! त्यानंतर ही जोडी 'बम्बई का बाबू' व त्यानंतर खूप वर्षांनी "शरीफ बदमाश" साठी एकत्र आली, दरम्यान राज खोसलांनी

आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटातील थीममधील केवढी तरी विविधता वाढवली. 'काला पानी' रहस्यरंजक होता तर 'मेरा गाव मेरा देश' डाकूपट, 'वह कौन थी?' रहस्यपट तर 'दो रास्ते' सामाजिक!. खरं तर राज खोसलाच्या पंचवीस चित्रपटांवर वेगळा फोकस हवा! त्याच्या 'नकाब' (89)च्या निमित्ताने खारच्या त्याच्या निवासस्थानी अतिशय सविस्तर मुलाखतीचा योग आला असता त्याने फ्लॅशबॅकमध्ये जात अनेक गोष्टी सांगितल्या. त्यातील एक म्हणजे, देव आनंद त्याचा बालमित्र होता तरी 'शरीफ बदमाश'च्या वेळेस त्यांचे पटकथाकार के. ए. नारायण यांच्यासंदर्भात काही बिनसले. नारायण यांच्या पटकथेनुसार आपल्याला जाता येत नाही

असं राज खोसलाचं म्हणणं होतं. विजय आनंद दिग्दर्शित "ज्वेल थीफ" (१९६७) आणि "जॉनी मेरा नाम" (१९७०) च्या यशापासून के. ए. नारायण 'स्टार' पटकथाकार म्हणून ओळखले जात. राज खोसला यांनी या सगळ्यात "शरीफ बदमाश"कडे काहीसं



दुर्लक्ष केले आणि "कच्चे धागे"वर सगळे लक्ष केंद्रित केले. त्यात राज खोसलांचा आवडता 'व्हीके' (अर्थात विनोद खन्ना) होता. देव आनंदने आपल्या खेळकर शैलीत राज खोसलाची समजून काढायची ठरवले व तो चक्क "कच्चे धागे"च्या सेटवर गेला. त्यात तो यशस्वी ठरला. राज खोसलाने आपल्याला हवे तसे "शरीफ बदमाश"मध्ये बदल

केले. यात सगळाच रंग उडाला आणि त्यात हा क्राईम थ्रीलर रंगला नाही. याचा परिणाम अर्थात पिक्चर फ्लॉप होण्यात झाला! "काला पानी"च्या प्रदर्शनास ६८ वर्ष पूर्ण होत असतानाच राज खोसला व देव आनंद जोडीवर हा एक फोकस! चित्रपट रसिकांच्या किमान तीन पिढ्या एव्हाना जुन्या आठवणीत गेले असतीलच, एका पिढीला आपण हा चित्रपट मॅटीनी शोला पाहिल्याचे आठवेल तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने 'यू ट्यूब'वर हा रहस्यरंजक चित्रपट 'एन्जॉय' करायचे ठरवलेही असेल. ('लिंक' दिलीय.) जुन्या काळातील चित्रपटांची दखल ही अशी अनेक पिढ्यांना जोडते!

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान - शनिवार लेख एन्टरटेन्मेन्ट)
♥

लेख क्र. ९५

'खोटे सिक्के' @ चक्क ५२ वर्षे!
'जीवन मे तू डरना नही...!'

एखादा अन्य भाषेतील चित्रपट पाहत असतानाच त्यावरुन अर्थात त्याच कॉन्सेप्टवरुन आपणही आपल्या शैलीत, आपल्या भाषेतील चित्रपट निर्माण करावा असे एकाच वेळेस दोन, तीन पटकथा लेखक व दिग्दर्शकांना वाटू शकते. चित्रपट माध्यमात वावरताना अशी सतत शोधक नजर हवी असतेच. त्यातील कोणी मूळ चित्रपटाचे अगदी कॅमेरा मूव्हमेंटसह आणि संकलन याची हुबेहुब नक्कल करेल तर कोणी मूळ चित्रपटातील कथा कल्पना अर्थात जर्म घेऊन आपल्या दृष्टिकोनातून चित्रपट साकारतो. आपली

क्रिएटीव्हीटी दाखवतो. ते करताना आपण साकारत असलेल्या भाषेतील चित्रपटाची संस्कृती तो विचारात घेतो. तात्पर्य, अमूक चित्रपटाची रिमेक असा हा 'सही रे सही' प्रकार असतो असे नाही.... आणि तसं होऊही नये!

असाच एक एकाच वेळेस अनेकांना प्रभावित करणारा जगविख्यात दिग्दर्शक अकिरा कुरोसावा. सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीस अकिरा कुरोसावा यांचे 'सेव्हन सामुराई' व 'मॅग्निफिशिएन्ट सेव्हन' या महान कलाकृती जगभरात गाजत होत्या. त्या पाहून हिंदीत एकाच वेळेस तीन हिंदी चित्रपट निर्माण करण्याचे सुचले गेले याची कदाचित तुम्हाला कल्पना नसेल. अर्थात, अनेकदा असं काही होतेय हे खूप उशिरा एकमेकांच्या लक्षात येते. आणि साहजिकच स्पर्धेची भावना जागी होते. मूळ थीम काय? डाकूच्या टोळीच्या दहशतवादाने पिचल्या गेलेल्या गावाची सोडवणूक करण्यास बाहेरगावचा नायक (एक अथवा दोन, कदाचित पाच) येतो आणि डाकू व त्याच्या साथीदारांचा

खातमा केला जातो. गावकरी या नायकांचा उदो उदो करतात. गोष्टीचे हीरो, गावाचे हीरो होतात! हे मध्यवर्ती सूत्र अधिकाधिक रंगतदार मसालेदार मनोरंजक करण्याची प्रत्येकाची क्षमता आणि खुबी वेगळी. शिबू मित्रा दिग्दर्शित 'खून की किमत' (१९७४) असाच एक नायक (महेन्द्र संधु) अशाच डाकूच्या दहशतीखाली, त्याच्या शस्त्राच्या दबावाखाली दबून राहत असलेल्या एका गावात

येतो आणि त्या गावकऱ्यांना विश्वासात घेतो, एकत्र करतो आणि डाकूचा खातमा करतो. पटकथा संवाद लेखक सलिम-जावेद हे कायमच मूळ गोष्टीत अनेक प्रकारचा मसाला पेरण्यात हुशार मानले गेलेले. त्यांनी दिग्दर्शक रमेश सिप्पीसाठी "शोले" (रिलीज १५ ऑगस्ट १९७५) लिहिताना

त्यात हिंसक सूडकथेची जबरा पेरणी केली. गब्बरसिंगची (अमजद खान) दहशत एवढी की अनेक वर्ष मिनर्व्हा थिएटरच्या परीसरात गेलो तरी जणू घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू येत असे म्हटले जाई. 'शोले'च्या गुणवत्तेची आजही उलटसुलट चर्चा होत असते हे मोठेच यश. आणि यातीलच आणखीन एक चित्रपट एन. डी. कोठारी निर्मित व नरेंद्र बेदी दिग्दर्शित 'खोटे सिक्के' (मुंबईत रिलीज २९ मार्च १९७४. तब्बल ५२ वर्षे झाली देखील!). यात पाच मित्र नायक अशाच एका गावावरची डाकू जंगा (अजित) याच्या शस्त्रधारी टोळीची दहशत खतम करुन टाकतात! मध्यवर्ती सूत्र साधारण सारखेच! पण त्याच्या अवतीभवतीच्या व्यक्तीरेखा आणि त्यांच्या गोष्टीत प्रत्येकाने आपापल्या पध्दतीने मनोरंजनाचा तडका लावला. 'खोटे सिक्के'चे लेखन सतीश भटनागर यांचे आहे. चित्रपटाचे छायाचित्रणकार पीटर परेरा यांचे तर संकलन बी. एस. ग्लाड यांचे! (हा चित्रपट "द मॅग्निजिसिएंट सेवन" (१९६०) हा

"अमेरिकन" सिनेमा, तसेच "फॉर अ फ्यू डॉलर्स मोअर" (१९६५) यावर बराचसा/अंशतः आधारित आहे! फिरोजखानचा तो "टिपिकल" पोशाख सुद्धा पाश्च्यात्य परिधानावर आधारित आहे. यातील थीम्स व पार्श्वसंगीत तर बऱ्याचशा "फॉर अ फ्यू डॉलर्स मोअर" वर आधारित असल्याचा "गुगलवर" स्पष्ट उल्लेख आहे! हा "चित्रपट" प्रदर्शित झाला तेव्हा त्या सिनेमाला "फक्त प्रौढांसाठी" (A) प्रमाणपत्र देण्यात आले होते.. कारण त्यात "वयस्कांसाठी" बरेच "खाद्य" होते! पण नंतर त्याच्या "संशोधित" आवृत्तीला "A/U" प्रमाणपत्र देण्यात आले असावे! कारण.. तो सिनेमा "गणेशोत्सवात" चक्क "रस्त्यावर" दाखवण्यात आल्याचे मी स्वतः "खेतवाडीतील" एका गल्लीत पाहिलेय! असो!)

चित्रपटाच्या सुरुवातीस श्रेयनामावलीसह नायक (फिरोझ खान) घोडेस्वारी करीत करीत अशाच एका डाकूच्या अतिशय दहशतीखाली दबून जगत असलेल्या गावात येतो! तेव्हा बॅकग्राऊंडला किशोरकुमारच्या

आवाजात 'जीवन मे कभी डरना नही, सर नीचा कभी करना नही..' आयुष्याचे तत्वज्ञान सांगणारे गाणे!

गाणे सुरु असते, पिक्चरभर संघर्ष कथा असणार याचीच ही चाहूल आणि मग डाकू जंगा (अजित) व त्याच्या क्रूरकर्मा, हिंसक साथीदारांनी (भूषण तिवारी, मोहन बग्गड इत्यादी अनेक) एका गावाला वेठीला धरलेले दिसते (मला नेहमीच प्रश्न पडायचा या गोरगरीब नागरिकांचा छळ करुन, त्यांना दहशतीखाली ठेवून या फिल्मी डाकूंना काय मिळते? त्यात एकादा धान्याचा साठा करणारा जमीनदारही असे. त्या एकालाच धमकावता येणार नाही का?) अशातच जंगा रामूच्या (पेंटल) वडिलांची हत्या करतो. याचा सूड म्हणून रामू शहरात जाऊन पाच सहा लढवय्यांना गावात घेऊन येतो! त्यांचा नायक म्हणजे काऊबॉयचे रुपडे. त्याच्या एन्ट्रीला पाश्चात्य संगीत. (ते तर 'फॉर अ फ्यू डॉलर्स मोअर' या चित्रपटावरुन तर घेतलंय हे तर मी आधीच सांगितलंय!) नायकाचे साथीदार आहेत, डॅनी (डॅनी डेन्झोपा), जगन

(नरेन्द्रनाथ), भग्गू (सुधीर), सलिम (रणजीत), जीत (कंवलजीत). हे निधड्या छातीचे लढवय्ये! प्रत्येकाची आपली एक जगण्याची शैली. 'भग्गू' गावातील एकेका युवतीला लग्नाचे स्वप्न दाखवतो. तसेच या प्रत्येकाला गावात एकेक प्रेयसी मिळते! नायकाला पारो (रेहाना सुल्तान), तसेच अन्य दोघांना रीमा (अलका....ही शहरातून गावात आली आहे!) आणि मधु (मधुचंदा) या सापडतात. गावात अनेक लहान-मोठ्या व्यक्ती आहेत. त्या भूमिकेत सत्येन कप्पू (न्यायाधीश), व्ही. गोपाल (हवालदार किशनलाल), लीला मिश्रा, मा. अलंकार, मुराद, विजू खोटे, गुरबचन सिंग (पोलीस), जॉनी व्हिस्की असे अनेक! चित्रपट सर्वसाधारण मसालेदार मनोरंजक! त्या काळातील अनेक डाकूपटांतील एक! एका दृश्यात अलका 'द प्लॅन इज मिसिंग' हे इंग्लिश पुस्तक वाचताना दिसते. एकूणच पिक्चर वेस्टर्न टाईप पण देशी मसाला असा! मारहाण दिग्दर्शक रवि खन्नाला मात्र भरपूर स्कोप मिळाला! या चित्रपटाचे कलाकार निश्चित

करताना अनेक गोष्टी घडल्या. दिग्दर्शक नरेंद्र बेदी व राजेश खन्ना अतिशय चांगले मित्र! या जोडीचा जी. पी. सिप्पी निर्मित 'बंधन' (१९७०) सुपरहिट झालेला! (इथे एक महत्त्वाचं सांगतोय! 'नरेंद्र हिरावत' म्हणजे 'एन. एच. स्टुडिओज' यांच्या सर्व 'लिंक्स' सहज पाहता येत नाहीत, हे दु:खद आहे! हट्टी आहेत ते.. आणखी काय!!) तर.. नरेंद्र बेदीला वाटले 'खोटे सिक्के'चा नायक राजेश खन्नाच असावा! पण त्याचा डेटसचा प्रॉब्लेम होता म्हणे! म्हणून फिरोझ खानची निवड झाली. एकीकडे फिरोझ खान स्वतःचा निर्मित व दिग्दर्शित 'धर्मात्मा' (१९७५) या सिनेमाच्या प्राथमिक तयारीत होता. अफगाणिस्तानला जाण्यापूर्वी 'खोटे सिक्के'चे मोठेच चित्रिकरण सत्र राजस्थानातील उदयपूर जवळील एका गावात असल्यानेच त्याने होकार दिला! याच शूटिंगच्या वेळेस डॅनी व रणजीत हे 'धर्मात्मा'साठी निश्चित झाले. डॅनीने याच गडबडीत रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१९७५) तील गब्बरसिंगच्या

भूमिकेसाठी पहिली सिटींग केली. (धर्मेंद्र, हेमा मालिनी, जी. पी. सिप्पी वगैरेंबरोबरचा डॅनीचा या सिटींगचा फोटो सोशल मिडियात मोठ्याच प्रमाणावर व्हायरल झालाय) डॅनीने दोन गोष्टींचा विचार केला, 'खोटे सिक्के' आणि 'शोले'ची मध्यवर्ती कथासूत्र जवळपास सारखेच आहे! मग एकच चित्रपट करुयात. तोपर्यंत 'खोटे सिक्के' बराच झाला होता. आणि 'शोले'च्या व 'धर्मात्मा'च्या शूटिंगच्या तारखा सारख्याच आहेत. आपण 'धर्मात्मा'साठी जाऊयात! डॅनीच्या नकारानंतर रणजीतला गब्बरसिंगसाठी विचारणा करण्यात आली. पण डॅनीचा लेखी नकार आणि मगच मी विचार करतो असे रणजीत म्हणाला. या 'खोटे सिक्के'चे शूटिंग उदयपूरजवळील ज्या गावातील घरात झाले तेथील एक मध्यमवयीन स्त्रीकडे अनेक म्हशी होत्या आणि त्यांचे दूध सहकारी संस्थेला पाठवले जाई. रणजीतने त्या महिलेला सांगितले, त्या दुधाची रोजच्या रोज रबडी बनवून चित्रपटाच्या युनिटला खायला द्यायची. साधारण महिनाभर

हे शूटिंग चालले. त्या दिवसाचे दूधाचे बिल बारा हजार इतके आले! रणजीतला याच कामाचे दहा हजार रुपये मिळाले. आपल्या खिशातून दोन हजार गेले यापेक्षा आपण युनिटला आनंदी ठेवले हे रणजीतला जास्त महत्वाचे वाटले. खुद्द रणजीतनेच मला हा त्याच्या मुलाखतीच्या निमित्ताने किस्सा सांगितला. एका चित्रपट निर्मितीत अशा अनेक लहान मोठ्या रंजक गोष्टी असतात. 'खोटे सिक्के'त गीत संगीत व नृत्याला फार स्कोप नव्हताच! मजरुहची गीते व राहुल देव बर्मनचे संगीत ही अनेक चित्रपटांतील जोडी यात पुन्हा एकदा जमली इतकेच. किशोरकुमारच्या आवाजातील 'जीवन मे कभी..' त्या काळात चक्क आदर्श गाणे वाटे! 'खोटे सिक्के' निर्मितीत अशा अनेक गोष्टी आहेत. दिग्दर्शक नरेंद्र बेदीने 'बंधन' (१९६९), 'जवानी दीवानी' (१९७२) यांच्या सुपरहिट नंतर एकदम तीन चित्रपटांचे दिग्दर्शन हाती घेतले. रमेश बहेल निर्मित 'दिल दीवाना' (रणधीर कपूर व जया भादुरी), रणजीत विर्क दिग्दर्शित 'बेनाम' (अमिताभ

बच्चन व मौशमी चटर्जी) आणि हा 'खोटे सिक्के'! व १९७४ या एकाच वर्षात हे तीनही चित्रपट प्रदर्शित झाले. त्यातला 'दिल दीवाना' साफ आपटला. नरेंद्र बेदीने त्यानंतर 'रफू चक्कर' (१९७५), 'अदालत' (१९७६), 'महाचोर' (१९७६) वगैरे अनेक चित्रपट दिग्दर्शित केल्यावर "खोटे सिक्के" चा पुढचा भाग म्हणून "कच्चे हिरे" (१९८२) हा चित्रपट पडद्यावर आणला! ते करताना फिरोझ खान, नरेन्द्रनाथ, डॅनी यांनाच घेतले. मात्र रणजीतच्या जागी शक्ती कपूरची निवड केली. नायिका म्हणून रिना रॉयची निवड केली.

एव्हाना हिंदी चित्रपटाच्या रसिकांना डाकूपटाचे आकर्षण ते काय राहिले होते? आणि नवीन गोष्ट आणणार कोठून? कालांतराने दिग्दर्शक संजय गुप्ताने संजय दत्त

वगैरेची निवड करुन "खोटे सिक्के"च्या रिमेकची घोषणा केली ती हवेत विरली! "खोटे सिक्के" फार सॉलीड वगैरे पिक्चर नव्हता, टाळ्या शिट्यांनी टाईमपास करणारा होता, ती अपेक्षा पूर्ण होत असल्यानेच सत्तरच्या दशकात मॅटीनी शोला चांगलाच रिस्पॉन्स मिळवत राहिला. "खोटे सिक्के " म्हटलतं तर बी ग्रेड मसाला पिक्चर. त्यावर कायमच 'फोकस' मात्र 'ए' ग्रेड! तेच तर महत्वाचे असते. सगळेच चित्रपट पडद्यावरुन गोडाऊन मध्ये जात नसतात. काही कशा ना कशा आठवणींसह सतत 'दिसत' राहतात.

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ९६

"जॉनी मेरा नाम" @ ५६ वर्षे.. कधीही कुठूनही केव्हाही पहावा, तोच इम्पॅक्ट!!

"जॉनी मेरा नाम" आपण अनेक कारणास्तव पुन:पुन्हा पाहू शकतो. एन्जॉय करु शकतो. त्यासाठी तुम्ही देव आनंदने भक्त असा अथवा नाही. पिक्चर आवडणारच!

दिग्दर्शक विजय आनंदच्या अर्थात गोल्डी आनंदच्या या चित्रपटाच्या प्रत्येक फ्रेमवर 'डायरेक्टर टच' साठी पाहू शकतो. तो या चित्रपटात शब्दश: गुंतलाय असा आपल्याला 'फिल' येतो. सेन्सॉर सर्टिफिकेट सरकून त्रिमूर्ती फिल्मचा लोगो दिसल्यापासून रुपेरी पडद्याशी जोडले जाते ते अगदी

पिक्चर संपला तरी कायम राहते. विजय आनंदच्या 'वेल पॅकिंग' अर्थात बंदिस्त, वेगवान पटकथेसाठी पाहू शकतो. पिक्चरभरचे टर्न आणि ट्वीस्ट आपल्याला गुंतवून ठेवतात! विजय आनंदच्या जोरदार, चमकदार, प्रभावी संवादासाठी पाहू शकतो! विजय आनंदच्या संकलनासाठी पाहू शकतो. चित्रपट माध्यमात पटकथा व संकलन या गोष्टीची उत्तम जाण असणारा चांगला दिग्दर्शक म्हणून ओळखला जातो. येथे तर 'या सर्व भूमिका' गोल्डी आनंदने उत्तमरित्या पेलल्यात! लोकप्रिय गाण्यांसाठी पाहू शकता. विशेष उल्लेखनीय गोष्ट,
गोल्डी आनंदचा दिग्दर्शनीय टच त्याच्या चित्रपटातील गाण्यातही दिसतो.

चित्रपट माध्यमाचा अभ्यास करण्यासाठीही हा चित्रपट पहावा. पटकथा कशी लिहावी/ असावी, दिग्दर्शन म्हणजे काय यासाठी हा चित्रपट अतिशय उत्तम!

एक अतिशय परिपूर्ण व्यावसायिक मनोरंजक चित्रपट म्हणजे 'जॉनी मेरा नाम' (मुंबईत रिलीज २० नोव्हेंबर १९७०. मेन थिएटर मराठा मंदिरला ज्युबिली हिट!) सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या युगातील हा चित्रपट, मॅटीनी शो, रिपीट रन, दूरदर्शन, व्हिडिओ, मनोरंजन वाहिन्या, ओटीटी असा चित्रपटाचा प्रेक्षकांपर्यंत पोहचण्याच्या बदलत्या माध्यमातही आपला 'इम्पॅक्ट' कायम ठेवून आहे. 'यू-ट्यूब'वर तो कुठूनही, केव्हाही, कितीही बघा तोच अनुभव येईल. एक थ्रीलर चित्रपट म्हणून पुन्हा पाह्यचे ठरवाल! (मी तर 4K ची 'लिंक' दिलीय)

हॉलीवूडमध्ये साठच्या दशकात शॉन कॉनरीचा 'जेम्स बॉण्ड' एकदमच फॉर्मात होता. 'माय नेम इज बॉण्ड, जेम्स बॉण्ड!' असा हुकमी संवाद खेळवत एक हातात पिस्तूल तर दुसरीकडे ललना आणि मग कधी ॲक्शन, कधी रोमान्स, कधी थरार असा तो सगळा सिनेमा रंगतदार असायचा. आता त्या काळात आपल्याकडे मारधाडपट म्हणजे स्टंटपट

(दारासिंग, रंधवा, शेख मुख्तार यांचे!), पण त्यांना मुख्य प्रवाहात स्थान नव्हतेच. (मेन स्ट्रीममधील चित्रपटगृहेही त्यांना मिळत नसत) अशा वेळी हिंदीत मेन स्ट्रीममध्ये 'जेम्स बॉण्ड' कल्चरचा सिनेमा आणायचाय आणि ती देखील चॉकलेट/ रोमॅन्टीक हीरो अशी प्रतिमा असलेल्या देव आनंदला हीरो करुन, आव्हानात्मक अथवा कसोटीचे होते ना ? तोपर्यंत विजय आनंद दिग्दर्शित 'नौ दो ग्यारह' (१९५७), 'काला बाजार' (१९६०), 'गाईड' (१९६५), 'ज्वेल थीफ' (१९६७), 'तेरे घर के सामने' (१९६३) या चित्रपटात देव आनंदने भूमिका साकारल्याने या सख्ख्या भावाना एकमेकांची कार्यशैली, मूडस, टेम्परामेंट, स्वभाव, असल्याच तर काही मर्यादा आणि क्षमता माहिती झाली होती. ('तेरे घर के सामने' या सिनेमात "इक घर बनाऊंगा.." हे गाणे अगदी उल्लेखनीय आहे! १९६३ चा हा चित्रपट! "पिक्चर इन पिक्चर" हे तंत्र तेव्हा विकसित झालेलं? मला ठाऊक नाही! पण "गोल्डीने" या गाण्यात तसा प्रकार

केलाय! "नूतन" ग्लासात दिसतेय! तसेच "दिल का भंवर करे पुकार.." हे "कुतुबमिनार" मध्ये/वर चित्रित झालेलं!? तो

प्रकारही थक्क करणारा! या दोन्ही गोष्टी माझ्यासारख्या सामान्य रसिकांसाठी विस्मयकारक होत्या! कसं बरं केलं असेल हो त्यांनी?! पण व्वा! कडक सॅल्युट! उपरोल्लेखित सर्वच चित्रपटातील गाणी "सुपरहिट" होती, बरं!) तोपर्यंत देव आनंद म्हणजे, केसांचा कोंबडा, कपाळावर आलेले केस अथवा बटा, मानेपर्यंत पूर्ण बटने लावलेला शर्ट, कधी गळ्याभोवती स्कार्फ, कॉर्डरॉयची पॅन्ट, तिरकी चाल, पाहण्याची विशिष्ट लकब आणि पडदाभर लोभस दिलखुलास वावर. अपवाद अगदी काही प्रमाणात 'गाईड'. त्यात यासह त्याची वेगळी व्यक्तिरेखा आहे. पण देव आनंद

म्हटल्यावर जो देव आनंद डोळ्यासमोर आला असेल तो तसाच!

विजय आनंद दिग्दर्शित "जॉनी मेरा नाम" असाच स्मार्टपणे घडला. "जॉनी" ची मूळ कथा के. ए. नारायण यांची! गोल्डी आनंदने देव आनंदच्या मूळ शैलीला कायम ठेवून 'जॉनी'त एकीकडे जेम्स बॉण्ड कल्चरची जोडणी दिली! (हे काहींना पटते, काहींना नाही ते जाऊ देत) दुसरीकडे व्हीलनच्या हल्ल्याने पित्याचा खून झाला आणि त्यात दोन भाऊ लहानपणी हरवले आणि मोठेपणी सापडले आणि त्यांनी त्यांनी पित्याच्या खूनाचा बदला घेत व्हीलनचा खातमा केला याची जोड दिली. 'गाईड' (१९६५) 'तिसरी मंझिल' (१९६६), 'ज्वेल थीफ' (१९६७) अशी यशाची हॅटट्रीक साध्य केल्यावर 'जॉनी मेरा नाम' सारखा गुन्हेगारीपट गोल्डीने का दिग्दर्शित करावा? गोल्डी कायमच चौकटीबाहेरचा विचार करणारा दिग्दर्शक असल्याने त्याने 'जॉनी'चे आव्हान यशस्वीपणे पेलले. सुरुवातीला या

चित्रपटाचे नाव 'दो रुप' असे होते. के. ए. नारायण यांना त्यात विशेष असे आकर्षण वाटले नाही. त्या काळातील आघाडीचे वितरक गुलशन रॉय (मॉडर्न मुव्हीज) यांनी त्रिमूर्ती फिल्म या नावाची चित्रपट निर्मिती संस्था स्थापन केली आणि या चित्रपटाच्या निर्मीतीत पाऊल टाकले. त्याचाही एक किस्सा, एका फिल्मी पार्टीत राज कपूरने गुलशन रॉयना टोमणा मारत म्हटले, काहींना फक्त चित्रपटाचा व्यवसाय करता येतो. तो बनवता येत नाही. त्याबद्दल काहीच माहित नाही. गुलशन रॉय हे त्या काळातील चित्रपट वितरणातील मोठे प्रस्थ. त्यांच्याच मॉडर्न मुव्हीज या चित्रपट वितरण संस्थेच्या वतीनेच 'गाईड' आणि इतर काही चित्रपट रिलीज झाले. गुलशन रॉयनी जणू राज कपूरला कृतीतून उत्तर देण्यासाठीच त्रिमूर्ती फिल्म या चित्रपट निर्मिती संस्थेची स्थापना केली. मॉडर्न मुव्हीजचे ऑफिस नाझ चित्रपटगृहाच्या इमारतीत तर त्रिमूर्ती फिल्मचे ऑफिस ताडदेवला होते.

देव आनंदचे वैजयंतीमालाबरोबरचा टी. प्रकाश राव दिग्दर्शित 'दुनिया' (१९६९) आणि आशा पारेखसोबतचा शंकर मुखर्जी 'महल' (१९६९) फ्लॉप झाल्याने त्याला हिटची गरज होतीच. हेमा मालिनीची करियर नुकतीच सुरु झाली होती, 'सपनों का सौदागर' हा तिचा पहिला चित्रपट निर्मितीवस्थेत होता व अशाच एखाद्या हुशार दिग्दर्शकाच्या चित्रपटात तिला भूमिका हवी होती. 'तिसरी मंझिल' पासून प्रेमनाथ नायकाचे रुपडं मागे ठेवून आता ऐसपैस शरीरमानानुसार व्हीलन साकारायला लागला होता तरी त्याला मोठी लिफ्ट हवी होती. एव्हाना प्राण चरित्र भूमिकांकडे वळला होता!

विजय आनंदने 'जॉनी' चे दिग्दर्शन, पटकथा लेखन, संवाद लेखन, संकलन असे सगळेच आपल्या हाती ठेवले (तशी आणि तेवढी त्याची क्षमता होती). 'सपनों का सौदागर'चा काही भाग पाहून त्याने हेमा मालिनीची निवड केली. चित्रपटसृष्टीपासून दुरावलेल्या आणि दुखावलेल्या प्रेमनाथची व्यवस्थित समजून काढत खलनायकाची भूमिका दिली. आणि शूटिंग सुरु केले. क्लायमॅक्सला चित्रपटातील सगळ्याच व्यक्तीरेखा एकत्र आणून वेगळाच इम्पॅक्ट साध्य केला. तोपर्यंत आपण या पिक्चरमध्ये पुरते गुंतलेले असतो. गोल्डीच्या दिग्दर्शनातील गीत संगीत व नृत्य हे कायमच पटकथेला पुढे नेणारे आणि श्रवणीय. तेच येथेही. 'ओ मेरे राजा..' गाण्याच्या शूटिंगच्या वेळचा एक किस्सा खुद्द विजय आनंदची मुलाखत घेतली तेव्हा समजला. या गाण्यात देव आनंद आणि हेमा मालिनी रोपवेमधून जातात याचे शूटिंग बिहारमधील राजगीर येथे सुरु असताना 'रोप वे' अचानक मध्येच बंद पडली. खाली खोल दरी होती आणि पाह्यची

भीती होती. देव आनंदने प्रसंगावधान राखून हेमा मालिनीचा तणाव कमी केला. या गडबडीत रोप-वेवरचा काही भाग चित्रीत करायचा राहिला. म्हणून गोरेगावच्या फिल्मीस्तान स्टुडिओत तेवढाच सेट लावला आणि शूटिंग केले. आणि गोल्डी आनंदने संकलनात ते फिट्ट केले. (गंमत म्हणजे, या पाळण्यात एकालाच बसण्याची परवानगी असताना देव आनंद व हेमा मालिनी असे दोघे कसे? हीच तर खरी 'गोल्डी'ची कमाल!)

हा शंभर टक्के दिग्दर्शकाचा चित्रपट! चित्रपट माध्यम व व्यवसायात येणाऱ्यांना 'जॉनी मेरा नाम' म्हणजे एक प्रकारचा अभ्यास आहे! चित्रपट कसा निर्माण करावा, कसा असावा/पहावा/ सांगावा यासाठी आदर्श आहे. मुंबईपासून नेपाळपर्यंत गुंतलेले गुन्हेगारी जाळे आणि ते तोडण्याकरता सज्ज असणारे मुंबई पोलीस. याभोवती सगळा खेळ! नायिकेला वडिलांवरच्या अन्यायाचा बदला घेत त्यांचा शोध घ्यायचाय. यात टिपीकल 'फॉर्म्युला' म्हणजे सोहम उर्फ

'जॉनी' (देव आनंद) आणि त्याचा भाऊ 'मोती' म्हणजे मोहन (प्राण) हे लहान असताना रणजित राजसाब (प्रेमनाथ) त्यांच्या पित्याची हत्या करतो, तेव्हा ते हरवतात. मोठेपणी जॉनी पोलीस अधिकारी होतो. तो रुप पालटतो! जेलमध्ये जातो. एका गुन्हेगारीशी (जीवन) दोस्ती करुन आपल्या डावपेचाची आखणी करतो. तो रणजितचे साम्राज्य खतम करतो. रणजित अतिशय गुलछबू, अय्याशी! आपल्या बॉडी गार्डच्या (रंधवा) गर्लफ्रेन्ड तारा (पद्मा खन्ना) त्याची बुरी नजर. जॉनीची आपली प्रेयसी रेखा (हेमा मालिनी) हिच्या संबंधातून आणखीन काही गोष्टी साध्य करतो. चित्रपटात इफ्तेखार, दुलारी इत्यादींच्याही भूमिका! आय. एस. जोहरची तिहेरी भूमिका! पहले राम, दुजा राम आणि तीजा राम अशी त्यांची नावे आणि तेवढीच धमाल!

इंदिवर यांच्या गीताना कल्याणजी आनंदजी यांचे संगीत आणि सगळी गाणी आजही लोकप्रिय आहेत. 'ओ मेरे राजा..', 'नफरत करने वालो के..', 'पलभर के लिए कोई

हमे..' (अनेक खिडक्यां मधून हे गाणे रंगते, खुलते) , 'ओ बाबुल प्यारे..', 'मोसे मोरा श्याम रुठा..', 'हुस्न के लाखो रंग..' या हिट गाण्यांतील प्रेमनाथ आणि पद्मा खन्ना यांच्यावरचे 'चित्रण' केवढे तरी बोल्ड! सेन्सॉरने ते सोडले कसे याची बरीच चर्चा रंगली. अशातच पिक्चर हाऊसफुल्ल गर्दीत सुरु असतानाच ते कापणार अशीही जोरदार बातमी पसरली. तसे काही झाले नाही. तीही एक पब्लिसिटी स्ट्रेटेजी!

या चित्रपटाची पब्लिसिटी खुबीने केली होती. या पिक्चरच्या यशात त्याचाही वाटा. विशेष म्हणजे 'जॉनी'ची होर्डींग्स पंधरवड्याला बदलली गेली. पिस्तूलधारी देव आनंदला खेटून उभी असलेली हेमा मालिनी असे होर्डींग्स जाऊन सगळ्यांचे चेहरे असलेले होर्डींग्स तेथेच दिसू लागल्याने आश्चर्य वाटणारच. कालांतराने मी मिडियात आल्यावर गुलशन रॉय यांच्या मुलाखतीचा योग आला असता हे मी त्यांना अगदी आठवणीने विचारले असता

त्यांनी दिलेले उत्तर प्रमोशनचा उत्तम फंडा होता. चित्रपट उगाच सुपर हिट ठरत नाहीत हो, प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्यामागे बराच माईंड सेट असतो. व्यावसायिक रणनीती असते. असायलाच हवी! 'जॉनी' चे मुंबईतील मेन थिएटर मराठा मंदिरमधील प्रीमियर भन्नाट आणि ग्लॅमरस! देव आनंदच्या नवीन रुपाची ही सुरुवात होती! स्वप्नाळू देव आनंद आता 'जमेल तसा ॲक्शन हीरो' झाला होता. विजय आनंद दिग्दर्शित 'छुपा रुस्तम' व 'बुलेट', प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित 'वॉरंट'! खुद्द देव आनंद दिग्दर्शित 'लूटमार'मध्ये तसा प्रत्यय आला. तसा तो बदलत्या काळाबरोबर बदलणारा हो! त्यावरुनही त्याची काहींनी थट्टा केली ते जाऊ देत! कोणत्याही थट्टा मस्करीचा आपल्यावर परिणाम होऊ न देण्याचं चातुर्य देव आनंदकडे होते. 'जॉनी' ची काही वर्षांनी कन्नड (अपूर्व संगमा), तेलुगू (इडुरुलेनी मनिशी) आणि तमिळ (राजा) अशी एकेक करत रिमेक आल्याच. त्या यायलाच हव्यात! 'जॉनी' ने प्रेमनाथची घौडदौड सुरु

झाली. त्याच्या करियरचा ग्राफ चढत गेला. कधी व्हीलन तर कधी सकारात्मक चरित्र भूमिका साकारु लागला. त्याच्या वागण्यातही वाह्यातपणा आल्याचे गॉसिप्स रंगले. पद्मा खन्नाला हमखास तिखट भूमिका आणि त्यात एक नृत्य अशा भूमिका मिळू लागल्या. त्यात तिची करियर झाली. एक सुपर हिट पिक्चर बरेच काही घडवतो! आणखीन एक विशेष! पिक्चरच्या यशाने देव आनंदला 'अभी भी मै जवान हू..!' असं बरीच वर्ष उत्साहात म्हणण्याचा जणू परवाना मिळाला. हेमा मालिनीचं रुपडं तिला 'ड्रीम गर्ल'ची उपाधी फिट्ट करणारे ठरले. 'जॉनी...' मुळेच हेमा मालिनीचा स्वतःचा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला, तो कायमचाच! यशाचे इफेक्ट्स अथवा साईड इफेक्ट्स असे कसेही असू शकतात. 'जॉनी मेरा नाम' एकदाच घडतो, एकदाच घडला! भारी ठरला! गंमत म्हणजे, १९७० साली दिलीपकुमारचा 'गोपी' (रिलीज २९ ऑगस्ट १९७०) देव आनंदचा 'जॉनी मेरा नाम'

आणि राज कपूरचा 'मेरा नाम जोकर' (रिलीज १८ डिसेंबर)

या चित्रपटातील स्पर्धेत 'जॉनी' जिंकला तो कायमचाच...!!

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान - शनिवार लेख)
♥

लेख क्र. ९७

'हीरो' @४२ पार!
'मेरी प्रेम कहानी का, तू हीरो है...!

'तू मेरा जानू है तू मेरा दिलबर है..

मेरी प्रेम कहानी का तू हीरो है,

पर प्रेमग्रंथ के पन्नो पर..

अपनी तकदीर तो झीरो है!..

'सिंगल स्क्रीन' थिएटर्सच्या पडद्याभर अर्धी अधिक दाढी विचित्र वाढलेला जयकिशन (जॅकी श्रॉफ) बासरी वाजवतोय आणि राधा माथूर (मीनाक्षी शेषाद्री) अतिशय छान नृत्य करत त्याच्यावरचे प्रेम व्यक्त करतेय..!

सुभाष घई गाण्याच्या टेकिंगमध्ये, पडद्यावरच्या दृष्टी सौंदर्यात कसलीही कसर सोडत नाही म्हणूनच तर त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गाणी पुन:पुन्हा पहावीशी वाटतात. आठवली तरी वा गुणगुणली तरी डोळ्यासमोर येतात. 'हीरो 'मधील सगळीच गाणी सुपर हिट!

१६ डिसेंबर १९८३ रोजी मुंबईत हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा पहिले दोन आठवडे सो सो होते असं तुम्हाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल! मुंबईत मेन थिएटर 'गंगा'ला सोमवारपासून करंट खिडकीवर तिकीटे मिळू लागली. पण बुकिंग क्लर्कला शांतता नव्हती. तिकीटे फाडली जात होती. पब्लिक येत होतं, त्यांना पिक्चर आवडत होतं. गाण्यांवर तर पब्लिक फारच फिदा होते. माऊथ पब्लिसिटी वाढत होती. गाणी लाऊडस्पीकरवर रिपीट होत होती आणि मग असा काही पिक्चर सुपरहिट झालाय की आजही म्हणजेच आत्ता बेचाळीस वर्षांनंतरही त्या गाण्यांसह पिक्चर एन्जॉय केला जातो! ग्रेट!!

'हीरो' हिट व्हायला थोडा वेळ लागला कारण दोनच आठवड्यांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या "कुली"चे बॉक्स ऑफिसवर जबरदस्त वादळ थोडं ओसरणे आवश्यक होते. त्याही पिक्चरने अलंकार थिएटरमध्ये पन्नास आठवडे मुक्काम केल्यावर पाठोपाठ 'हीरो'नेही गंगा थिएटरमध्ये तेवढाच यशस्वी मुक्काम केला!

'हीरो'चं मेकिंग बहुरंगी. प्रत्येक पिक्चरची निर्मिती एक स्वतंत्र स्टोरी! चित्रपट कसा बनतो हे अनेक प्रकारचे चित्रपट पाहून शिकावे!

सुभाष घईने अभिनय केलेले ('उमंग', 'गुमराह', 'आराधना', 'ग्रहण' वगैरे!), त्यात यश न मिळाल्याने पटकथा लेखक ('आखरी डाकू' वगैरे!) याच धडपडीत निर्माते एन. एन. सिप्पी यांनी 'कालीचरण' (१९७६) च्या वेळेस दिग्दर्शनाची संधी देताच पहिल्याच पावलावर रौप्य महोत्सवी यश आणि दिग्दर्शक म्हणून वाटचाल सुरु झाली! अन्य निर्मात्यांचे एकेक चित्रपट दिग्दर्शित करत असतानाच

आपणही निर्माता होण्याची महत्वाकांक्षा जागी व्हायलाच हवी. २४ ऑक्टोबर १९८२ ला स्वतःच्या 'मुक्ता आर्ट्स'ची स्थापना करुन 'हीरो' निर्मितीत पाऊल टाकले. राम केळकर यांनी मसालेदार मनोरंजक अशी पटकथा लिहिली. म्युझिकल ॲक्शन प्रेमकथा हा फॉर्म्युला! सर्व प्रकारचा मनोरंजनाचा मसाला भरला. पब्लिकला पैसा वसूल मनोरंजन हवे असते. सुरुवातीस 'संगीत' असे नाव सुचले, ते बदलले. बरंच झालं! सुरुवातीस संजय दत्तला हा रोल फिट्ट बसेल असे वाटले. सुभाष घईच्या गुलशन रॉय निर्मित 'विधाता'त त्याने काम केले होतेच. पण 'त्याचं कामात लक्ष नाही' असं लक्षात येताच, कमल हसनचा विचार झाला. तो एकाच वेळेस तेलुगू, तमिळ व हिंदीत बिझी! कुमार गौरव दाढी ठेवायला तयार नाही. आणि पैसे जास्त हवे होते. तोपर्यंत देव आनंद दिग्दर्शित 'स्वामी दादा'मध्ये मूळचा मॉडेल जॅकी श्रॉफला शक्ती कपूरचा उजवा हात साकारायची भूमिका मिळालीय, ही खबर सुभाष घईला

मिळाली. त्याची निवड केली. संजू नाही म्हणून आता रति अग्निहोत्रीचाही विचार सोडून द्यावा लागला. मुनमुन सेननेही नकार दिला. संगीता बिजलानीने विशेष रस दाखवला नाही. अशातच मनोज कुमारचा भाऊ राजीव गोस्वामी याची 'कलयुग और रामायण' मधील (१९८२) नायिका मीनाक्षी शेषाद्रीची निवड केली. ती योग्यच ठरली!

शम्मी कपूर, संजीवकुमार, अमरिश पुरी हे घईच्या 'विधाता'त होतेच. त्यांचा होकार नि तारखा मिळण्यात अडचण नव्हतीच. नीता मेहता, मदन पुरी, बिंदू, भारत भूषण, शक्ती कपूर (अगोदर डॅनी होता. पण त्याला ही व्यक्तिरेखा न पटल्याने त्याने शूटिंगलाच येणे थांबवल्याचा किस्सा गाजला!), उर्मिला भट्ट, माणिक इराणी वगैरे कलाकार ठरले! मेहबूब रेकॉर्डिंग स्टुडिओत पहिलं गाणे रेकॉर्ड झाले, 'तू मेरा हीरो है...'! आनंद बक्षी लिखित गीताला लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत. अनुराधा पौडवाल आणि मनहर उधास यांनी गायले! त्या काळात

रेकॉर्डिंग स्टुडिओत सगळ्याच वादकांचा प्रचंड ताफा असे. त्यात फ्यूट वाजवायला हरिप्रसाद चौरसिया, तर अण्णा जोशी डफली वाजवायला! नागेश सुर्वे शिळ वाजवायला! अनेक अनेक वादक! फुल्ल ऑर्केस्ट्रेशन! जय्यत तयारी. आवश्यक तेव्हा रिटेक आणि फायनली गाणे ओके. लक्ष्मीकांतजी बेहद्द खुश होते. ते सुभाष घईला म्हणाले, हे तर झालेच पण 'हीरो'तील सगळीच गाणी सुपर हिट होतील. आत्मविश्वास म्हणतात तो हाच आणि तो खरा ठरला. मार्केटमध्ये ध्वनिमुद्रिका आणि ध्वनीफित येताच गाणी सगळीकडे पोहचली. लोकप्रिय गाणी चित्रपटाची भारीच पब्लिसिटी करतात. 'डिंग डॉन्ग ओ बेबी सिंग अ सॉन्ग..' (अनुराधा पौडवाल व मनहर उधास. या गाण्यात पडद्यावर सुभाष घईचंही दर्शन घडते. कोणी खवचटपणे म्हणे, दिग्दर्शक दिसला! जाऊ देत!), 'मोहब्बत ये मोहब्बत..' (लता मंगेशकर व सुरेश वाडकर), 'लंबी जुदाई..' (रेश्मा), 'निंदीया से जागी बहार..' (लता मंगेशकर), 'प्यार करने वाले

कभी डरते नहीं..' (लता मंगेशकर व मनहर उधास) आणि 'तू मेरा जानू..' (अनुराधा पौडवाल व मनहर उधास) ही सगळीच गाणी सुपर हिट! आनंद बक्षी आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट संगीत शौकिनांना दिली आहेत. त्यातील 'टॉप टेन' चित्रपटात 'हीरो'ची गाणी आहेत. सरोज खान नृत्य दिग्दर्शिका होत्या. तरी सुभाष घईच्या चित्रपटातील गीत संगीत व नृत्यावर 'खास सुभाष घई टच' असतोच असतो. (का कुणास ठाऊक? तो चक्क मनोजकुमारच्या दिग्दर्शनातील चित्रपटा तील गाण्याची आठवण करुन देतो!)

जॅकी श्रॉफला गाणे सादर करण्याचा वा नृत्याचा अभिनय येत नाही अशी सरोज खानने सुभाष घईकडे तक्रार केली असता घईनं म्हटले, 'एक दिन यह लडका देखो कहा जायेगा!' एखाद्या नवोदितावरचा असा विश्वास खूपच महत्वाचा! 'येथे दिग्दर्शक दिसतो' असं म्हणूया! जॅकी श्रॉफ चांगला विद्यार्थी आहे. तो शिकत राहिल असे सुभाष घईचं

म्हणणं होते! 'राम लखन'च्या गाण्याच्या शूटिंगमध्ये जॅकी श्रॉफची प्रगती पाहून सरोज खानना आपले त्याच्याबद्दलचे जुने शब्द आठवले. जॅकीही सुभाष घईच्या प्रत्येक चित्रपटात भूमिका साकारतोय. पाकिस्तानी गायिका रेश्मा मुंबईत आल्यानिमित्त राज कपूरने आयोजित केलेल्या पार्टीत तिचं गायन ऐकून सुभाष घई कमालीचे इम्प्रेस झाले आणि 'हीरो'साठी तिचं गाणे घ्यायचे ठरवले! पण तिच्या गायनाच्या पध्दतीत गाणे रेकॉर्ड करण्यात आलेल्या अडचणींवर मात करण्यात आली. 'निंदीया से जागी बहार..'चे उटीला भल्या पहाटे शूटिंग असतानाच मीनाक्षीला चार ताप होता. तरी तिने शूटिंग केले. या सगळ्याचा रिझल्ट सकारात्मक आला. हे किस्से एकदा सुभाष घईच्या मुलाखतीचा योग आला असता समजले! रेकॉर्ड व कॅसेटस्ची विक्रमी विक्री झाली. पिक्चरचे छायाचित्रणकार कमलाकर राव तर संकलक वामन गुरु! दोन्हीत उच्च दर्जा. हे पिक्चर टीम स्पीरीटचं यश. चित्रपटात प्रत्येक लहान मोठ्या व्यक्तिरेखेला स्थान.

राजदूत मोटारसायकलही जणू एक व्यक्तीरेखा. खरं तर ती प्रॉडक्टची जाहिरात. ती फिट्ट बसवली. हीरोची गॅन्ग मोटारसायकलवरून फिरतेय/जगतेय. पिक्चरची गोष्ट एका ओळीत सांगायची तर, हरमन मौला अथवा बिनधास्त टपोरी बॅड बॉईज मित्रांसोबत आयुष्याची मौज मजा घेणारा 'हीरो' आणि एका परंपरावादी एकत्र श्रीमंत कुटुंबातील युवती यांचे निस्सीम प्रेमाची सुभाष घई स्टाईल मांडणी. राम केळकर यांनी नाट्यच असे खुलवले, रंगवले की पब्लिसिटीवर बसून राहणार आणि त्यात गाणी अशी की कोणतेही गाणे पडद्यावर सुरु होताच कोणीही सिगारेट, चहा, लघुशंका यासाठी बाहेर पडणार नाहीत. त्या काळात मोबाईल नव्हता. १९८२ साली देशात रंगीत दूरदर्शन व व्हिडिओ आला होता आणि 'पिक्चर चोरीला जाऊन त्याची बेकायदेशीर कॅसेट यायची'. या अडथळ्यांवर 'हीरो'ने मात केली. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठीचा "हीरो"चा प्रेस शो आठवतोय. 'न्यू एक्सलसियर' मधील

चौथ्या मजल्यावरील मिनी थिएटरमधील आमच्या सहा वाजताच्या खेळास खुद्द जॅकी श्रॉफ हजर असतानाच काही दृश्यांवर दोघा चौघांनी रिर्माक पास केले. जॅकी श्रॉफ देव आनंदची कॉपी करतो वगैरे वगैरे आणि त्यावरुन हंसे निर्माण होत. मध्यंतरात जॅकी श्रॉफ चक्क मान खाली घालून बसल्याचे आजही आठवतेय. त्या काळात तो दक्षिण मुंबईतील वाळकेश्वर येथील तीन बत्तीला राह्यचा. त्याच चाळीत जाऊन त्याची मुलाखत घेताना ही आठवण सांगताच तो मनापासून हसत हसत म्हणाला, "मै तो डर गया था. मुझे लगा तुम लोग पिक्चर फाड देंगे...."

असो! समीक्षकांना फारसा न आवडलेला "हीरो" पब्लिकला असा काही आवडला की अनेकांनी पुन:पुन्हा एन्जॉय केला आणि आता बेचाळीस वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ओटीटीवर एन्जॉय करतील. २०१५ साली निखिल अडवानी दिग्दर्शित याची रिमेक फारच कंटाळवाणी आणि मूळ चित्रपटातील काही ट्रॅक सोडलेली. ही रिमेक लवकरात

लवकर विसरण्यासाठी मी मूळ चित्रपट पुन्हा एन्जॉय केला..!

प्यार करनेवाले कभी डरते नही

जो डरते है वो प्यार करते नहीं..

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर - झूम प्रहर)
♥

लेख क्र. ९८

"जोशिले" @ ३७ वर्षे...
"शोले" बनवायचा.. एक व्यर्थ प्रयत्न!!

सिनेमाच्या जगातील सर्वात भारी गोष्ट म्हणजे, सुपर हिट पिक्चरसारखाच पिक्चर आपणही बनवू असे वाटणे!

आता याला तुम्ही प्रभावित होणे म्हणा, नक्कल म्हणा, अति आत्मविश्वास म्हणा वा रिमेक करणे म्हणा. सुपर हिट चित्रपटावरुन चित्रपट काढण्याची प्रेरणा घेऊन अनेक चित्रपट अनेक वर्ष पडद्यावर येताहेत.

रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (मुंबईत प्रदर्शित १९७५) च्या यशायासून अनेकांना वाटले आपणही "शोले" सारखाच जबरदस्त मसालेदार मनोरंजक चित्रपट पडद्यावर आणू. बी. सुभाष दिग्दर्शित "आँधी तुफान" पासून रामगोपाल वर्मा दिग्दर्शित "आग" पर्यंत अनेक चित्रपट आले. त्यात सिबते हसन रिझवी दिग्दर्शित "जोशिले" (१९८९) नावाचाही एक चित्रपट होता. तो फारसा कोणाच्या लक्षातही नसेल कदाचित!

चित्रपटाची जोरदार घोषणा होताना त्याचा दिग्दर्शक शेखर कपूर होता व निर्माता सिबते हसन रिझवी होता. सनी देओल, अनिल कपूर, श्रीदेवी, मीनाक्षी शेषाद्री अशी जबरदस्त स्टार कास्ट आणि खलनायकाच्या भूमिकेत राजेश विवेक. चित्रपटाची घोषणा करतानाच हा बिग बजेट शोले स्टाईलचा जबरदस्त ॲक्शनपट असेच म्हटले गेले. शेखर कपूर "मासूम" (१९८३) व "मिस्टर इंडिया" (१९८७) अशा दोन भिन्न पठडीतील चित्रपटांचा समीक्षक व रसिक

प्रेक्षक यांची उत्तम दाद मिळाल्याने एकदम भन्नाट फॉर्मात होता. "मिस्टर इंडिया" निर्मितीवस्थेत असतानाच शेखर कपूरने "जोशिले" ची पूर्वतयारी सुरु केली. आणि त्यातही खास उल्लेखनीय गोष्ट "जोशिले" ची पटकथा जावेद अख्तर यांची होती. 'मिस्टर इंडिया" सलिम-जावेद या जोडीने लिहिलेला शेवटचा चित्रपट! तो पडद्यावर येईपर्यंत ही जोडी वेगळी झाली (त्या काळात ही जोडी फुटली असेच म्हटले गेले). आणि सलिम खान व जावेद अख्तर हे स्वतंत्रपणे पटकथा व संवाद लेखन करु लागले.. असे जावेद अख्तर व दिग्दर्शक शेखर कपूर "जोशिले" साठी एकत्र आले म्हटल्यावर "बिग ब्रेकिंग न्यूज". एकूणच थाटमाट जणू "शोले"च बनवायला चाललेत असा. पण सगळ्याच गोष्टी इतक्या सहज कशा घडतील? चित्रपटाचा जंगी मुहूर्त झाला तेव्हा चित्रपटाचे नाव "जोशिले जोशिले" असे फोर्सफुल्ल होते! सगळीकडे कव्हरेज येताना "पुन्हा शोले निर्माण होतोय" असाच सूर होता. अशी टामटूम करण्याची काही

आवश्यकता होती काय? शेखर कपूरकडून अशी अजिबात अपेक्षा नव्हतीच. शोले एकदाच पडद्यावर येतो. तसा तो आला. सुरुवातीस नरम वाटचाल असलेला शोले काही दिवसांतच असा काही चालायला, धावायला लागला की आज पन्नास वर्ष पूर्ण झाली तरीही त्याचा सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रावरील प्रभाव कायम आहे.

शेखर कपूरने शिवधनुष्य तर उचलले तोच निर्माते व

वितरक गुलशन राय यांनी "जोशिले जोशिले" या नावालाच आक्षेप घेतला. कारण, त्यांनी निर्मिलेल्या यश चोप्रा दिग्दर्शित "जोशीला" (दिवाळी १९७३) या चित्रपटाचे नाव त्यांना कोणालाच द्यायचे नव्हते. "जोशीला" या नावाचे सर्वाधिकार आपणाकडे आहेत ही गुलशन राय यांची भावना. म्हणून

चित्रपटाचे नाव "जोशिले" असे केले. शोलेसारखाच भव्य दिव्य चित्रपट काढायचा म्हणून प्रवीण भट्ट, को हंग चांग व दिलीप मुखर्जी असे तीन कॅमेरामन सज्ज झाले. उत्तर प्रदेशातील पहाडी भागात चित्रीकरण सुरु झाले. राजेश विवेक साकारत असलेला "योगी डाकू" हा गब्बरसिंगसारखा खौफनाक, क्रूरकर्मा, हिंसक वृत्तीचा, अक्राळविक्राळ, जालीम असणार अशा बातम्या येवू लागल्या. उगाच असे वाटू लागले, "शोले" सारखाच जबरदस्त ॲक्शन पॅक्ड चित्रपट पडद्यावर येतोय. खरं तर शोले पडद्यावर येईपर्यंत तो असा भारी चित्रपट असेल, भारतीय चित्रपटसृष्टीतील माईलस्टोन ठरेल, जबरदस्त लोकप्रियतेमुळे तो जणू या देशाची लोककथा ठरेल असे अजिबात वाटले नव्हते! चित्रपटाचे व्यावसायिक यशापयश हे रसिक प्रेक्षकांच्या हाती असते. त्याचा विसर न व्हावा. अशातच चित्रपट अर्धाअधिक झाल्यावर शेखर कपूरने जोशीलेचे दिग्दर्शनच सोडले. एका बिग बजेट चित्रपटाला

प्रचंड मोठा सांस्कृतिक धक्काच! एव्हाना सनी देओल, अनिल कपूर, श्रीदेवी व मीनाक्षी शेषाद्री हे अन्य चित्रपटात बिझी झाले. त्यांच्या पुन्हा तारखा मिळवून चित्रपट पूर्ण करणे आव्हानात्मक झाले. आणि त्यातही आता दिग्दर्शन कोण बरे करणार? अगोदरच चित्रपट "ओव्हर बजेट" झालेला. त्यामुळेच पटकथेत फेरफार करणे आलेच. कसेही करुन चित्रपट पडद्यावर तर यायला हवा. निर्माते सिबते हसन रिझवी यांनीच ती जबाबदारी स्वीकारली. आणि जसे जसे शक्य होईल तसे चित्रिकरण करीत करीत एकदाचा "जोशिले" पूर्ण झाला आणि पडद्यावर येईपर्यंत तो "शोले" ची दहावी वगैरे "झेरॉक्स" झाला होता. मला आठवतय मुंबईतील मेन थिएटर अप्सरामध्ये तो पाहात असताना त्याच्यातील विस्कळीतपणा प्रकर्षाने जाणवत होता. आणि त्याहीपेक्षा दुर्दैव म्हणजे, शैतान योगी डाकू गब्बरसिंगच्या सावलीच्या आसपासही पोहचला नव्हता. तो नुसताच इकडून तिकडून ओरडत, हंसत, खिदळत होता. अशाने

गब्बरसिंगसारखी दहशत कशी काय निर्माण होईल? हंसेच होईल ना? गब्बरसिंग आपल्या पहिल्याच दृश्यापासून प्रेक्षकांवर जणू मानसिक दबाव टाके. आपली दहशत निर्माण करे. मोजक्याच शब्दात भीती निर्माण करे, "कितने आदमी थे...?"

"आँधी तुफान" काय, "जोशिले" काय आणि अगदी राजकुमार संतोषी दिग्दर्शित "चायना गेट" चित्रपट काय, "शोले"चा जबरदस्त प्रभाव पुसू देऊ शकत नव्हतेच! रामगोपाल वर्मा दिग्दर्शित "रामगोपाल वर्मा की आग" हा चित्रपट तर अगदीच शेकोटी ठरला. रामूकडून अशी अजिबात अपेक्षा नव्हतीच. रामगोपाल वर्मा त्यानंतर आपला जुना फॉर्म मिळवू शकला नाही. का बरे त्याने केला शोलेच्या "रिमेक" चा अट्टाहास? असा प्रश्न पडला आणि त्याचे उत्तर त्यानेही कधीच दिले नाही. मूळ "शोले"चा प्रभाव पुसण्याचा

प्रयत्न करु नका हो. शोले ठरवून जमून आलेला चित्रपट नाही तर तो जमून आलेला मनोरंजक चित्रपट आहे!

"शोले" ची धग आज पन्नास वर्षांनंतरही कायम आहे,

कारण हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केले जाईल, चिक्कार टाळ्या व शिट्या मिळतील असा खच्चून तिखट मीठ मसाला हिंग जिरे लसूण त्यात होते. आणि त्यात आणखीन एक विशेष उल्लेखनीय गोष्ट, मुंबईत मिनर्व्हा चित्रपटगृहात "सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम" असा अनुभवणे थरारक होते. आणि तेच निर्णायक ठरले. मिनर्व्हातील शोलेचा रोमांचक अनुभव आणि अन्य चित्रपटगृहात शोले पाहणे यात बराच फरक होता. याचं

कारण, मिनर्व्हातील सत्तर एमएमचा विशाल पडदा आणि स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीमचा इफेक्ट. घोडेस्वार असो, ट्रेनचा प्रसंग असो, वीरु व जय यांच्यातील नाणेफेक असो, मिनर्व्हात "शोले" काही वेगळाच दिसे. म्हणून तर त्या काळात मुंबईभरचे चित्रपट रसिक आपल्या विभागातील चित्रपटगृहात शोले पाहिल्यावर पुन्हा एकदा शोले पाहण्यास मिनर्व्हात येत. अहो इतकेच नव्हे, त्या काळात गावाकडचा पाहुणा मुंबईत आल्यावर त्याला गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी, मरीन ड्राईव्ह, मलबार हिल अशी प्रेक्षणीय स्थळे दाखवतानाच त्यांना मिनर्व्हात शोलेही दाखवत आणि ते पाहुणे गावी गेल्यावर पारावरच्या गप्पांत मुंबईत मिनर्व्हात शोले पाहून आलो याचा अनुभव रंगवून खुलवून सांगत. याला चित्रपटाचा सामाजिक प्रभाव म्हणतात....

© दिलीप ठाकूर
(रविवार नवराष्ट्र १० ऑगस्ट २०२५)

लेख क्र. ९९

'वक्त', 'शोले', 'नागिन', 'जानी दुश्मन' वगैरेचे मल्टी स्टार कास्ट पोस्टर...!!

"पिक्चरचं पोस्टर" त्याच्या प्रसिध्दीतील महत्वाचा 'फंडा'! आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल माध्यमातूनही चित्रपट पोस्टरचा (त्याला आजच्या युगात डिझाईन म्हणतात!) प्रवास सुरु आहे. रस्त्यावरील विजेचे खांब, गल्लीच्या नाक्यावरील भिंत, बस स्थानक, रेल्वेस्थानक येथे पोस्टर दिसू लागले रे लागले की, नवीन चित्रपट प्रदर्शित होण्याची तयारी सुरु झाली याचाच जणू "सिग्नल"! पोस्टर हे प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचवण्याचे महत्वाचे माध्यम! ते

प्रामुख्याने "थीम"नुसार असावे अशी अपेक्षा, कधी ते स्टारला महत्व देणारे असते. श्याम बेनेगल यांच्या अंकुर, भूमिका, मंडी, झुबेदा अशा चित्रपटांची पोस्टर म्हणजे, येथे दिग्दर्शक दिसतो असे कौतुकाने म्हणतात वाटते!

तर निर्माता आणि दिग्दर्शक "राजकुमार कोहलीं"च्या चित्रपटाबाबत नेहमीच मी गंमतीने म्हणतो, त्यांच्या "मल्टी स्टार कास्ट" चित्रपटातील अनेक चेहरे मोहरे पोस्टरवर जेवढे मोठे तेवढेच पडद्यावर छोटे. अथवा पोस्टरवर जास्त फूटेज पण पडद्यावर अगदी जेमतेम! पण "मल्टी स्टार कास्ट" चित्रपट निर्मिती व दिग्दर्शकांची हौस मौज अखेरपर्यंत कायम होती!

खरं तर यश चोप्रा दिग्दर्शित व बी. आर. चोप्रा निर्मित 'वक्त' (१९६५) हा आपल्याकडचा पहिला "मल्टी स्टार कास्ट" चित्रपट असला तरी तो ट्रेण्ड रुजायला चक्क दहा वर्षे लागली! "वक्त" मध्ये बलराज साहनी, सुनील दत्त, राजकुमार, साधना, शशी कपूर, शर्मिला टागोर, अचला

सचदेव अशी जबरदस्त "स्टार कास्ट" आहे. एवढ्या मोठ्याच प्रमाणावर एकाच चित्रपटात नामवंत कलाकार असतात तेव्हा त्यांना पटकथेत उत्तमरित्या गुंफणे व त्यांना दिग्दर्शकांने योग्य न्याय देणे कसोटीचे असते. यश चोप्रा त्यात यशस्वी ठरले. यश चोप्रा यांचा दिग्दर्शनीय कौशल्याचा उत्तम नमुना म्हणून "वक्त" या चित्रपटाचा खास उल्लेख होतो!

जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१९७५) खणखणीत यशस्वी ठरला आणि हिंदी चित्रपटसृष्टीला जणू एकाच चित्रपटात तीन चार अथवा जमलंच तर पाच सहा नायक आणि नायिका यांना एकत्र आणण्याचा परवानाच मिळाला. "शोले"त धर्मेंद्र, संजीव कुमार, हेमा मालिनी, अमिताभ बच्चन, जया बच्चन व अमजद खान अशी मोठीच स्टार कास्ट! मिनर्व्हावर या सगळ्यांनाचा स्कोप देण्याइतपत जागा होती. मला आठवतय! मिनर्व्हावर बरोबर मध्यभागी ठाकूर बलदेव सिंग

(संजीवकुमार) याने गब्बरसिंगला (अमजद खान) याच्या गळ्यात आपला ताकदवान हात टाकलाय हे दृश्य होते. एका बाजूस पिस्तूलधारी गब्बरसिग तर दुसऱ्या बाजूस "यह दोस्ती हम नहीं तोडेंगे.." गाण्यातील वीरु व जय (अर्थात धर्मेंद्र व अमिताभ बच्चन). होळी खेळतानाचे वीरु व बसंतीही (हेमा मालिनी) या थिएटर डेकोरेशनवर होते. "शोले"चे मिनर्व्हावरचे भव्य दिमाखदार डेकोरेशन हा देखील एक रंजक विषय! "शोले" सुपरहिट ठरताच मल्टी स्टार कास्ट चित्रपटांचे युग आले. राजेश खन्नाचा स्वबळावर विश्वास (तो केवढा तरी आत्मकेंद्री!) म्हणून त्याने बराच काळ, मल्टी स्टार कास्ट चित्रपटापासून दूर राहणे पसंत केले. अन्यथा त्याची घसरण लवकर थांबली नसती. पण स्वभाव आडवा आला!

राजकुमार कोहलींच्या चित्रपटांची खासियत अर्थात मल्टी स्टार कास्ट चित्रपट. पटकथेनुसार ते अनेक कलाकारांना एकाच चित्रपटात एकाच तिकीटावर दाखवत

की एकेक करत अनेक कलाकार उपलब्ध होत गेले म्हणून आपला चित्रपट मल्टी स्टार कास्ट बनवत हा एक वेगळाच प्रश्न!



त्यांचा एक बहुचर्चित म्हणजे, 'नागिन' (१९७६) सुनील दत्त, जितेंद्र, विनोद मेहरा, अनिल धवन, फिरोझ खान, संजय खान, कबिर बेदी, मुमताज, रेखा, रिना रॉय, प्रेमा नारायण, योगिता बाली, नीलम मेहरा वगैरे! जेवढे नायक तेवढ्याच नायिका हा नियम आलाच वा हवाच!

या चित्रपटात इच्छाधारी नागिण (रिना रॉय) आपल्या नागरुपी प्रियकराचा (जितेंद्र) खातमा केलेल्या एकेकाचा 'चुन चुन के' बदला घेते! वेगळ्या भाषेत सांगायचे तर,

अमिताभच्या सूडनायकाची ही भाकड आवृत्ती होती! अगदीच सुमार मनोरंजन! पण लोकांना ते चक्क आवडले की हो! आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सिनेमाने चक्क रौप्य महोत्सवी यश संपादले (मुंबईत "नोव्हेल्टी" थिएटर मध्ये!) आणि कोहलींना जणू यशाचा फॉर्म्युलाच सापडला! आणि त्यांनी अगदी तस्साच इतके नायक म्हणूनच इतक्या नायिका असा 'जानी दुश्मन' (१९७९) काढला. आता ते मल्टी स्टार कास्ट चित्रपटांचे निर्माता व दिग्दर्शक अशी त्यांची ओळख झाली होती ना? त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांची खासियत तीच, एकाच तिकीटावर एकाच चित्रपटात अनेक कलाकार पाह्यला मिळतात. पण गोष्टीचे काय? सुनील दत्त, संजीवकुमार, जितेंद्र, शत्रुघ्न सिन्हा, विनोद मेहरा, रेखा, रिना रॉय, बिंदीया गोस्वामी, योगिता बाली, सारिका, नीता मेहता, जयश्री टी. वगैरे वगैरे बरेच! अगदी या चित्रपटाच्या प्रीमियर अथवा पार्टीलाही असाच स्टारडम! मल्टी स्टार कास्ट चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळेस मेकअप रुम्स नक्कीच कमी

पडल्या असतील. कारण तोपर्यंत "व्हॅनिटी व्हॅन" ही संकल्पना अस्तित्वात आली नव्हती.

या चित्रपटात गावात लग्नाची वरात येते आणि हमखास एक खून होतो अशी काही थीम होती. सस्पेन्स होता. क्लायमॅक्सला उत्तर मिळते आणि आतापर्यंत संशयाची सुई उगाच दुसरीकडे फिरत ठेवली असे वाटते!

दोन्ही चित्रपटात गीत संगीत व नृत्य यांची जबरा रेलचेल! काही गाणी लोकप्रियही! बरं त्या काळात एकादा चित्रपट अठरा अथवा वीस रिळांचा असणे यात वावगे काहीच नव्हतं. इतके स्टार एकाच चित्रपटात म्हटल्यावर लांबी वाढणारच! आणि चित्रपटाची नसली तरी "पोस्टरची उंची" वाढे! या चित्रपटाचे मेन थिएटर "नाझ" येथे तर

डेकोरेशनची उंची प्रचंड वाढल्याचे आजही आठवतेय! या चित्रपटानेही अर्थात रौप्यमहोत्सवी यश संपादले आणि मग पब्लिकला जणू हमी पत्र मिळाले, राजकुमार कोहलींच्या चित्रपटात अनेक मोठे स्टार असणारच. प्रत्येक स्टारचे

चाहते खुश होत. पण राजकुमार कोहली आपल्या नवीन चित्रपटावर काम सुरु करताना ते अगोदर जमतील ते स्टार साईन करुन मग पटकथा रचत की आपल्या चित्रपटात बरेच स्टार आहेत हे लक्षात घेत पटकथा आणि संवाद लिहा अशी त्यांची आपल्या स्टोरी डिपार्टमेंटला खास सूचना आणि मग सवलत असे, हे त्यानंतर अनेक वर्षांनी याच 'जानी दुश्मन'च्या रिमेकच्या सेटवर शूटिंग कव्हरेजसाठी गेलो तेव्हाही समजले नाही. काही फिल्मी गोष्टी न समजलेल्या बरे असते! जे काही असेल ते असो. त्यांचा आपला मार्ग वेगळा होता.

यापेक्षा त्यांच्या चित्रपटात वेगळेपण नव्हते आणि आपले चित्रपट यशस्वी ठरताहेत म्हटल्यावर ते हुकमी एक्का का सोडतील? एक लक्षात घ्या, राजेश खन्ना आणि अमिताभ बच्चन वगळता त्या काळातील जवळपास सर्वच "टॉप" च्या स्टार्सनी त्यांच्या चित्रपटात भूमिका साकारल्यात. अगदी स्मिता पाटीलनेही! (त्यांच्या 'बदले की आग' या चित्रपटात ती आहे. "पोस्टर" वर "लिंक" दिलीय!) व कोहलींच्या अशा सिनेमांची पब्लिकलाही छान सवय लागली होती, असे मल्टी स्टार कास्ट पोस्टर दिसले की ते समजून जात, हा राजकुमार कोहलींचा चित्रपट आहे. (येथेही दिग्दर्शक दिसतो असे म्हणता येईल हवं तर!) "शोले" नंतरच्या रमेश सिप्पी दिग्दर्शित "शान" (१९८०) मध्ये सुनील दत्त, शशी कपूर, अमिताभ बच्चन, शत्रुघ्न सिन्हा, राखी, परवीन बाबी, बिंदीया गोस्वामी, जॉनी वॉकर आणि कुलभूषण खरबंदा! अशी भली मोठी स्टार कास्ट! पण "शोले"ची सर आली नाही! आणि येणेही शक्य नव्हतेच! "शोले" साठीची या

जोडीची बंदिस्त पटकथा व जोरदार डायलॉग बाजी आणि "शान" साठीचे त्यांचे लेखन यात आश्चर्य वाटेल इतका फरक! (याबाबत मी एका रसिकांचे मत मांडू इच्छितो! काही समीक्षक भले आपले "स्वतःचे भिंग वापरून अमुक गोष्टींची तुलना करण्यात सतत मग्न असतात! जणू त्यांचे मत "हाच अंतिम शब्द"! पण तसं नसतं यार!) त्यांच्यामते "शान" हा सिनेमा त्यांनी आपल्यामते "शोले" सोबत त्यांनी तुलना केल्यामुळेच तितकासा गाजला नाही.. हे त्या रसिकाचं मत! कबूल! तो "चवदार" नसेलही, पण "अळणी" तर अजिबात नव्हता! असच प्रतित होतं! हे सत्य असेल तर तो सिनेमा "यू-ट्यूब"वर इतक्या लाख लोकांनी तो का पाहिला..? गंमत म्हणून?? हे कसे काय शक्य आहे!? असो! त्याचा



"स्टोरीबोर्ड" आणि "सादरीकरण" काही समीक्षक यांना आवडलाही नसेल! (त्यांची मर्जी!) पण तो काही लोकांना चक्क आवडला सुद्धा, हे काय मी सांगू? सर्वच गाणी तर झकास होती! "शोले" मध्ये "मो. रफी" नव्हता! ही कसर "द बर्निंग ट्रेन" मधल्या "कव्वालीने" भरून काढलीच होती. या "शान" मध्ये "मो. रफी" यांची गाणी होती...!

सगळेच मल्टी स्टार कास्ट चित्रपट भारी कसे ठरतील? राजकुमार कोहली दिग्दर्शित "बदले की आग" फुसका बार नाही का ठरला? या चित्रपटात सुनील दत्त, धर्मेंद्र, जितेंद्र, रिना रॉय, स्मिता पाटील, सारिका, राजीव आनंद, अरमान कोहली, कादर खान, शक्ती कपूर व प्राण अशी जबरदस्त स्टार कास्ट म्हणून चित्रपटात रंग भरेल असे कसे हो होईल? मल्टी स्टार कास्ट चित्रपट हा हव्यास नसावा. ती गरज असावी. वक्त! त्यावरुनच सलिम जावेद यांनी नवीन मसाला घालून पेरुन लिहिलेला नासिर हुसेन निर्मित व दिग्दर्शित "यादों की बारात"!



"शोले" (यावरुन फसलेल्या रिमेक केवढ्या तरी!), "जानी दुश्मन" हे त्या काळातील सुपरहिट मल्टी स्टार कास्ट चित्रपट. आजही त्यांचे अस्तित्व जाणवतेय तर मग आणखीन काय हवे?

व्यावसायिक चित्रपटाच्या जगात यशा सारखी सुंदर गोष्ट दुसरी नाही, मग ती 'यशाची बाजू' अशी का ना असेना?

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान, शनिवार लेख)
♥

लेख क्र. १००

"नहले पे दहला" @ ५० वर्षे
पडद्यामागच्या गोष्टी जास्त रंजक!

सुनील दत्तच्या वांद्र्यातील पाली हिलवरील अजंठा बंगल्यातील तळघरात असलेल्या मिनी थिएटरमध्ये एखादा चित्रपट अथवा गाणी पाहायला जाताना कायमच दिलीपकुमारच्या बंगल्यावर नजर पडायचीच. मीडियात असल्यानेच हा एक वेगळाच अनुभव. दिलीपकुमार आणि सुनील दत्त हे सख्खे शेजारी! ते कधीच कोणत्याही चित्रपटात एकत्र आले नाहीत, पण सुनील दत्त आणि सायरा बानू यांनी नायक नायिका साकारली आणि त्यात एक

चित्रपट होता 'नहले पे दहला'! मुंबईत हा चित्रपट २ एप्रिल १९७६ रोजी प्रदर्शित झाला, म्हणजेच या चित्रपटाच्या प्रदर्शनाला पन्नास वर्षे पूर्ण झाली.

मुंबईत या चित्रपटाचे मुख्य चित्रपटगृह शालिमार होते. हा गुन्हेगारीपट अगदीच साधारण मसालेदार मनोरंजक होता (म्हणाली तशी भट्टी जमली नव्हती) म्हणून चित्रपट रसिकांनीही त्याला तेवढेच साधारण स्वरुपाचे यश दिले. प्रेक्षक उगाच एखाद्या चित्रपटासाठी वेळ, पैसा आणि येण्या-जाण्यासाठी शक्ती खर्च करत नाहीत. अजंठा आर्ट्स या आपल्या बॅनरखाली सुनील दत्त यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आणि दिग्दर्शन राज खोसला यांचे आहे. सुनील दत्तने आपल्या या चित्रपटाचे काही दिवसांचे चित्रिकरण आपल्या बंगल्याच्या पहिल्या मजल्यावरील प्रशस्त हॉलमध्ये करायचं ठरवलं. सगळेच फिल्मवाले चित्रपट निर्मितीत पैशाची उधळपट्टी करत नाहीत. सायरा बानूला तर आपल्या बंगल्याजवळच हे चित्रिकरण असल्याने अधिक आनंद.

आपल्या बंगल्याच्या तिसऱ्या मजल्यावरून सुनील दत्तच्या पहिल्या मजल्यावरील चित्रिकरण दिसत असल्याने तिने आपल्या घरातूनच मेकअप करून जायचं ठरवलं. तसं ती करे आणि सुनील दत्तने आपल्या प्रॉडक्शनमधील एकाला वेगळीच कामगिरी दिली. दिग्दर्शक राज खोसला यांनी 'मॅडम को बुलाव, शॉट रेडी है' असं म्हणताच तो प्रॉडक्शन बॉय शिट्टी वाजवून सायरा बानूला सेटवर बोलवत असे. साधारण आठवडाभर हे चित्रिकरण होत असताना हे शिट्टी वाजवणे झाले. हे पाहून दिलीपकुमारने सुनील दत्तला म्हटले, असं हे शिट्टी वाजवून सायराना सेटवर बोलावण्यापेक्षा आपण दोघांच्या घराला जोडणारा एक पूल बांधूयात. हे ऐकून सुनील दत्त आणि सायरा बानू मनापासून हसले. ही अतिशय वेगळी अशी गोष्ट, सुनील दत्तच्या २००४च्या जन्मदिनानिमित्त सोशल मीडियात पोस्ट केली. केवढा एक्सलुझिव्ह किस्सा बघा! (सोशल मीडियावर अशा अनेक एक्सुझिव्हज आठवणी, गोष्टी, किस्से असतात ही एक

जमेची बाजू) सुनील दत्तच्या निधनानंतर संजय दत्तने अजंठा बंगला आणि त्यातील मिनी थिएटर, एडिटिंग रुम हे सगळे पाडून त्या जागी नवीन चकाचक आधुनिक शैलीची इमारत उभारली आहे. काळ बदलला, हेतू बदलले. जगणं बदललं. आपण एकत्र काम करावं असं अगदी साठच्या दशकात सुनील दत्त आणि सायरा बानू यांना वाटत होतं, पण तेव्हा दक्षिणेकडील काही चित्रपटांसाठी (खानदान, मिलन वगैरे) तशी ऑफरही होती. सुनील दत्तचे म्हणणे होते, एखाद्या प्रेमकथेसाठी आपण एकत्र येऊयात. सायरा बानू त्या काळातील एक सौंदर्यवान अभिनेत्री म्हणून ओळखल्या जात (राजेंद्रकुमार सायरा बानूकडे आकर्षित झाला आहे असे गॉसिप्स मॅगझिनमधून केवढे तरी पिकवले, शिजवले गेले) ज्योती स्वरूप दिग्दर्शित 'पडोसन' (१९६८) या भन्नाट विनोदी पटात सुनील दत्त आणि सायरा बानू पहिल्यांदाच एकत्र आले. पिक्चर सुपर डुपर हिट ठरला.

कधीही पहावा झक्कास टाईमपास!

‘नहले पे दहला’बद्दल काय सांगू? दिग्दर्शक राज खोसला माझ्या अतिशय आवडत्या दिग्दर्शकातील एक. त्यांच्या ‘नकाब’ (१९८४) या चित्रपटाच्या निमित्ताने वांद्र्यातील पाली हिलवरील निवासस्थानी मुलाखतीसाठी भेटलो असता त्यांनी दिग्दर्शित केलेल्या अनेक जुन्या चित्रपटांच्या चित्रिकरणाच्या वेळच्या गोष्टी सांगितल्या. त्यात ‘नहले पे दहला’बद्दल बोलण्यासारखे काहीही नव्हते. सत्तरच्या दशकातील एक हुकमी फॉर्मुला म्हणजे माँ बाप के खून का बदला आणि चित्रपटाच्या पहिल्या रिळात लहानपणी हरवलेले दोन भाऊ मोठे झाल्यावर चित्रपटाच्या क्लायमॅक्सला भेटणे आणि आपल्या आई वडिलांच्या खुनाचा बदला घेताना खलनायकाची धुलाई करणे. चित्रपटाची सुरुवात आणि शेवट यांच्या दरम्यानचा मनोरंजनाचा खचाखच मसाला म्हणजे पिक्चर असे सरळ साधे गणित होते. ते जमलं की पब्लिक खुश आणि जर गणित फसलं तर पब्लिक नाराज. असा एकदम सिधा

हिसाब! या चित्रपटाची मनोरंजनाची खिचडी जास्त शिजली नाही. खौफ़नाक खलनायक (प्रेमनाथ) एका प्रकरणात एक खून करतो, त्यात दोन लहान भाऊ हरवतात. त्यातला एक राम (सुनील दत्त) आणि दुसरा रहिम (विनोद खन्ना) भिन्न धर्मामध्ये लहानाचे मोठे होतात. हे बरे असते. सर्वधर्मसमभाव साधता येतो. रामची प्रेयसी बीना (सायरा बानू). या चित्रपटात बिंदू, रणजित, त्रिलोक कपूर, देव कुमार, ओम प्रकाश, अन्वर हुसेन, कामिनी कौशल, भारत भूषण इत्यादींच्याही भूमिका. राहुल देव बर्मनच्या संगीतातील 'सावन का महिना आ गया..' हे गाणे बरं होते. आश्चर्य वाटले ते दिग्दर्शक राज खोसला यांचे. खरंतर गुरूदत्तच्या दर्जाचा दिग्दर्शक. गुरूदत्त दिग्दर्शक आणि अभिनेताही. जास्त कौतुक वाट्याला आले. तशी गुणवत्ताही होती. राज खोसला यांनी दिग्दर्शित केलेल्या 'सीआयडी' (१९५६), 'काला पानी' (१९५८), 'सोलवाँ साल' (१९५८), 'एक मुसाफिर एक हसिना' (१९६२), 'वो कौन थी?'

(१९६५), 'मेरा साया' (१९६६), 'दो बदन' (१९६६), 'दो रास्ते' (१९६९), 'मेरा गाव मेरा

देश' (१९७१), 'कच्चे धागे' (१९७३), 'प्रेम कहानी' (१९७५), 'मै तुलसी तेरे आंगन की' (१९७८), 'दोस्ताना' (१९८०) हे चित्रपट विषयातील केवढी तरी विविधता दाखवताहेत. (याशिवाय त्यांचे 'शरीफ बदमाश' वगैरे चित्रपट जमले नव्हते.) एकच दिग्दर्शक रहस्यमय, भयपट, गुन्हेगारीपट, सामाजिक चित्रपट, डाकूपट, प्रेम त्रिकोण अशी केवढी तरी विविधता दाखवतो आणि या प्रत्येक चित्रपटातील गाण्यांचे टेकिंग अप्रतिम. 'नहले पे दहला'मध्ये राज खोसलाचा टच दिसला नाही. निर्माता म्हणून सुनील दत्तही विशेष

कारागिरी करण्यात अपयशी. अन्यथा 'अजंठा आर्ट्स' या बॅनरखाली मोनी भट्टाचार्य दिग्दर्शित 'मुझे जीने दो', सुनील दत्त दिग्दर्शित 'यादे' (हा एकपात्री चित्रपट आहे), 'रेश्मा और शेरा' असे दर्जेदार चित्रपट निर्माण केले. 'नहले पे दहला' सत्तरच्या दशकातील ठोकळेबाज आणि नियोजनाचा अभाव असलेला चित्रपट वाटला. मुंबईत शालिमार चित्रपटगृहात तरीही शंभर दिवसांचे यश प्राप्त केले. हे आश्चर्यच. त्या काळातील चित्रपट रसिकांच्या माफक अपेक्षा असत आणि या चित्रपटातील कलाकार लोकप्रिय होते. तेवढेही पुरेसं होतं. आवडत्या कलाकाराला पडद्यावर पाहण्यासाठी किमान एकदा तरी चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहणारे फिल्म दीवाने होते. प्रेम प्रेम प्रेम म्हणतात ते हेच!

'नहले पे दहला'च्या बरोबरच (म्हणजे शुक्रवार दिनांक २ एप्रिल १९७६ रोजी) प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित 'बारुद' (ऋषि कपूर आणि शोमा आनंद) आणि एस.

रामनाथन दिग्दर्शित ‘सबसे बडा रुपय्या’ (मेहमूद, विनोद मेहरा, मौशमी चटर्जी आणि फरिदा जलाल) हेही चित्रपट



प्रदर्शित झाले आणि त्यांच्या प्रदर्शनासही पन्नास वर्षे पूर्ण झाली. पण हे चित्रपट प्रदर्शित होत असताना रमेश सिप्पी दिग्दर्शित ‘शोले’ (१९७५)ची अक्राळविक्राळ क्रेझ जराही कमी झाली नव्हती. त्या वातावरणात टिकून राहण्यासाठी पिक्चरही तसा सॉलीड हवा होता...

© दिलीप ठाकूर
(रविवार रामप्रहर "झूम" वरून साभार!)

♥

लेख क्र. १०१

यश "शोले" चे आणि "दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे" चे !!

गणित एकदम सोपे आहे! मिनर्व्हा चित्रपट गृहातील "शोले"चा पाच वर्षांचा खणखणीत मुक्काम आणि "दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे" अर्थात "डीडीएलजे"चा मराठा मंदिर चित्रपटगृहातील मॅटीनी शोचा तब्बल "एकोणतीस वर्षांपेक्षा" जास्त काळ सुरु असलेला प्रवास, यात पारडे कोणाचे जड?????

प्रश्न एकदम सोप्पा! पण उत्तर? ते आपण या लेखाच्या माध्यमातून पाहण्याचा प्रयत्न करूया! "सुपर डुपर हिट्स"

या माझ्या "ई-बुकचा" हा "१०१ वा लेख" सादर करताना, म्हणजेच या "ई-बुकचा" कळसाध्याय गाठताना, हा "लेख" मी मुद्दामच देत आहे! मित्रांनो या "ई" पुस्तकात चित्रपट रसिकांसाठी नक्कीच एक अक्षय्य खजिना आहे! सगळे भाग नक्की वाचा, प्रांजळपणे तसेच अगदी बिनधास्त प्रतिक्रिया द्या! आवडल्यास सर्वत्र शेअर करा. ("ई-साहित्य प्रतिष्ठान"च्या या कार्यास उत्तुंग यश मिळो, याच शभेच्छा! तर... "शोले" (मुंबईत प्रदर्शित १५ ऑगस्ट १९७५) च्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण झाली असूनही त्याचा सामाजिक, सांस्कृतिक, माध्यम क्षेत्रातील प्रभाव आजही कायम आहे! "बातम्या" ते "मिम्स" असा या चित्रपटाचा प्रवास आहे. आजही एकाद्या लहान मोठ्या शहरांतील रिक्षावर शोलेची बसंती अथवा गब्बरसिंगचे स्टीकर असते. हेदेखील यशच! शोलेने मिनर्व्हात दिवसा तीन खेळ याप्रमाणे ३१ ऑगस्ट १९७८ रोजीपर्यंत हाऊसफुल्ल गर्दीत प्रवास केला. त्यानंतर तेथेच "मॅटीनी शो"ला चित्रपट शिफ्ट केल्यावर तो आणखी

दोन वर्ष असा मिळून एकूण पाच वर्ष मुक्काम केला! "डीडीएलजे" मुंबईत "न्यू एक्सलसियर" चित्रपटगृहात २० ऑक्टोबर १९९५ रोजी प्रदर्शित झाला (तो दिवस दिवाळीचा पाडवा होता). तेथे पन्नास आठवड्यांचा मुक्काम केल्यावर तो "मराठा मंदिर" चित्रपटगृहात मॅटीनी शोला शिफ्ट केल्यावर आजही, अगदी आजही मॅटीनी शोला सुरुच आहे!

चित्रपटाचे यश असे आकड्यात मोजायचे असते काय? निर्मितीचा खर्च इतका आणि कमाई इतकी असे सरळ रेषेत जाणारे ते गणित असते काय? त्यापलिकडे जात चित्रपट यशस्वी ठरतो.

काजोलने एकदा "डीडीएलजे"च्या निमित्ताने "एक्स"वर (अर्थात "ट्विटरवर") पोस्ट केली हे विशेषच!

"करवा चौथ"चा संदर्भ देत या चित्रपटावर सोशल मिडियात काही पोस्ट झाल्या!

या दोन्ही चित्रपटांनी "मुद्रित माध्यम" ते "डिजिटल युग", "लॅण्डलाईन फोन" ते "मोबाईल फोन","सिंगल-स्क्रीन थिएटर्स" ते "मल्टीप्लेक्स", "ओटीटी", "लोकल ट्रेन" ते "मेट्रो" असा सर्वच स्तरावर प्रवास केला आहे. आणि हेदेखील एक लोकप्रिय चित्रपटाचे वैशिष्ट्य!

मी आवर्जून जवळपास प्रत्येक वर्षी १९ अथवा २० ऑक्टोबर रोजी या मराठा मंदिर चित्रपटगृहाला भेट देऊन डीडीएलजेचा 'आठवड्याचा वाढलेला आकडा तो किती बघूया!' असा मनोमन विचार करत नजर टाकतो. त्यावेळी ही संख्या होती, १५६५वा आठवडा! (२५ एप्रिल, २०२६)

अबब! म्हणावा असाच हा विक्रमी मुक्काम! जगभरातील कोणत्याही भाषेतील चित्रपट असा इतकी वर्षे/इतके आठवडे चित्रपटगृहात मुक्काम करु शकत नाही. चित्रपटाच्या गुणवत्तेबद्दल अजिबात वाद नाही. कितीदाही पहावा झक्कास दिलखुलास, तजेलदार मनोरंजन आहे! बरं मराठा मंदिर चित्रपटगृहात तिकीट दर किती? तर ड्रेस सर्कल तीस रुपये आणि बाल्कनी चाळीस रुपये असे. सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या परंपरेतील आहेत. मल्टीप्लेक्स युगात चित्रपट पाहणे महाग झाले असताना तर हे तिकीट दर मात्र खिशाला परवडणारे (ऑनलाईन पेमेंटच्या तुलनेत स्वस्तच म्हणायचे.) यश चोप्रा यांनी आपल्या दिग्दर्शनात जे भावनिकपण जपले ('वक्त', 'इत्तेफाक', 'दाग', 'दीवार', 'मशाल', 'चांदनी', 'लम्हे' यात ते अनेक दृश्यात आहे), रोमान्स खुलवला! गीत संगीत व नृत्याची बहार खुलवली, ते सगळे त्यांचा पुत्र आदित्य चोप्राने अतिशय आकर्षक पॅकेजमध्ये (काळ बदलला होता हो. 'मसाला मिक्स' हा

शब्द मागे पडला!) पहिल्याच दिग्दर्शनात ते खुलवून रंगवून पडदाभर साकारले. आणि ते नव्वदच्या दशकाच्या उत्तरार्धात सुसंगत होतेच. देशात जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था यांचे वारे रुजत होते. समाजात नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्ग वाढत होता. महाग तेच चांगले अशीच एक प्रकारची मानसिकता समाजात मुरत होती. राजश्री प्रॉडक्शन्स निर्मित व सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित "हम आपके है कौन" (१९९४) ने वातावरण बदलण्यास सुरुवात केली होतीच. चित्रपट इतिहासातील हे टप्पे खूपच महत्वाचे. चित्रपटाचा अभ्यास करताना दखल घ्यावेत असेच! "डीडीएलजे"च्या एक हजाराव्या आठवड्यात शाहरूख



खान आणि काजोल मराठा मंदिर चित्रपटगृहात आवर्जून आले होते! आपल्याच चित्रपटाच्या यशाचा असा प्रवास त्यांनी असा येऊन एकदा पहावा हे विशेष उल्लेखनीय आहे! रसिकांच्या दोन पिढ्या ओलांडूनही हा चित्रपट आपले महत्त्व टिकवून आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचा ११२ वर्षांवर

फोकस टाकताना 'शोले' व 'डीडीएलजे' पहिल्या पंचवीस चित्रपटात येतातच! डीडीएलजे हा नव्वदच्या दशकातील पिढीची भाषा बोलणारा हा चित्रपट आहे. या यशात बदलत्या समाज घटकाचे प्रतिबिंब निश्चित आहे. आणि ते असतेच. चित्रपट व समाज असाच जोडला गेला आहे.

खरं तर "डीडीएलजे" चित्रपटाचे यश कशात? राज मल्होत्रा (शाहरूख खान) आणि सिमरन सिंग (काजोल) यांच्यातील ही अगदी दिलखुलास, मिस्कील, मार्मिक, खेळकर, खोडकर अशी प्रसन्न प्रेमकथा आहे! इंग्लंडमधील देखणं आकर्षक शूटिंग आहे. झक्कास आऊटडोअर्स लोकेशन आहेत. आपण प्रत्यक्षात तेथे आहोत असेच वाटते. 'शोले'साठी बंगलोरजवळील रामनगर येथे गावाचा सेट लावून त्याला 'रामगढ' असे नाव दिले. पिक्चर हिट होताच हे रामगढ पर्यटन स्थळ झाले. तर शोले'तील जेलचा सेट राजकमल कलामंदिर स्टुडिओत उभारला!

शोलेची गाणी आजही लोकप्रिय! चित्रपट झाला तेव्हा मात्र ती गाणी इतकी काही खास नाहीत असा मतप्रवाह होता. चित्रपट हिट झाल्यावर तीही गाजू लागली. पार्श्वसंगीत मात्र एकदम कडक! प्रत्येक प्रसंगावर राहुल देव बर्मनच्या प्रभावी पार्श्वसंगीताचा प्रत्यय येतोच. शोलेच्या संवादाची ध्वनिमुद्रिका प्रकाशित झाली, तीदेखील लोकप्रिय.

पार्श्वसंगीताची ध्वनिमुद्रिका आली त्यालाही भारी मागणी! "डीडीएलजे"ही संगीत सर्वकालीन सुपर हिट! "तुझे देखा तो मै जाना सनम.." (कुमार शानू व लता मंगेशकर), "जरा सा झूम लू मै.." (आशा भोसले व अभिजित भट्टाचार्य), "मेरे ख्वाबो मे जो आये.." (लता मंगेशकर), "मेहंदी लगा के रखना.." (लता मंगेशकर व उदीत नारायण), "हो गया है तुझको तो प्यार सजना.." (लता मंगेशकर व उदीत नारायण), "रुक जा ओ दिल दीवाने.." (उदीत नारायण) एक गाणे होतेय तोच दुसरं हवेसे वाटते! आणि यातलं कोणतेही गाणे आठवले वा गुणगुणले तरी डोळ्यासमोर पडद्यावरचे गाणे येते. आणखीन काय हवे? गाना हिट है तो पिक्चर भी सुपर हिट होना मंगता!

हिंदी चित्रपटसृष्टीच्या सर्वोत्कृष्ट दहा उत्तम पटकथा व तांत्रिकदृष्ट्या सकस चित्रपटात काय हवे? "गाना हिट है तो पिक्चर भी सुपर हिट होना!" शोले तर प्रेमकथांमध्ये "डीडीएलजे"ची "राज आणि सिमरन" यांच्या या प्रेमकथेचा

समावेश होतोच! एक टप्पा राज कपूर दिग्दर्शित 'बॉबी' (१९७३) या मोकळ्या ढाकळ्या तरुण प्रेमपटाचा होता. तोही एकावन्न वर्षांनंतरही तारुण्यात. इतकेच नव्हे तर हिंदी चित्रपटसृष्टीच्या वाटचालीचा अभ्यास करताना 'शोले' पर्यंतचा चित्रपट, आणि 'शोले' ते 'डीडीएलजे' असा एक स्थित्यंतरचा टप्पा आणि डीडीएलजे ते त्यानंतरचा काळ असा तो फोकस टाकायला हवा. चित्रपट अभ्यासक्रमात हेही महत्वाचे.

'शोले' असो वा 'दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे' हे चित्रपट प्रदर्शित झाले तेव्हा ते असा बहुस्तरीय आणि अबब म्हणावा असा प्रवास करतील असे कोणीही भविष्य वर्तवले नव्हते. तरी बरं चित्रपटसृष्टीत ज्योतिषी खूप आहेत! श्रध्दा अंधश्रध्दा यांची रेलचेल भन्नाट आहे. चित्रपटाच्या जबरदस्त यशाने त्याची सगळीच समिकरणे बदलून टाकलीत, बदल ही तर केवढी तरी मोठी गोष्ट आणि तेच त्याचे वेगळेपण आहे आणि मोठेच यश आहे. सिनेमाच्या जगात तर यश म्हणजेच

बरेच काही असते... शोले असो वा डीडीएलजे हे चित्रपट सिंगल स्किन, व्हिडिओ कॅसेट, व्हीसीआर, डीव्हीडी ते मल्टीप्लेक्स, मोबाईल स्क्रीन, ओटीटी असा प्रवास सुरु आहे, चित्रपट समिक्षक ते सोशल मिडियातील ट्रोलर (कधी कधी नकोतच त्यांच्या त्या उलटसुलट प्रतिक्रिया) अशी प्रगती आहे. पंधरा ऑगस्टचा मुहूर्त साधून मोठा चित्रपट प्रदर्शित करण्याचा ट्रेण्ड 'शोले'ने तर दिवाळीत चकाचक चित्रपट प्रदर्शित करण्याचा ट्रेण्डही डीडीएलजेने आणला आणि त्यात शाहरुख खान 'मेन हीरो' राहिलाय! शाहरुखचे " फॅन्स " यात बेहद्द खुश!

एक सुपर हिट चित्रपट बरेच काही पेरत असतो, घडवत असतोच. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीतील हेही एक वैशिष्ट्य. जगभरातील मिडियातून शोले व डीडीएलजेच्या यशस्वी वाटचालीवर कधी ना कधी "फोकस" टाकावा लागला यात बरेच काही आले... आज शोले पन्नास वर्ष सेलिब्रेशन निमित्त आपल्याकडील अनेक

यशस्वी चित्रपटांचा फ्लॅशबॅक समोर येत आहे. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर अनेक जुने यशस्वी चित्रपट येताहेत. आणि त्यानिमित्त त्या अनेक जुन्या चित्रपटांची होत असलेली चर्चा आपल्या चित्रपटाचा चौफेर वैभवशाली इतिहासच समोर आणत आहेत!

माझा कौल "शोले"ला! पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपट असे त्याचे वर्णन करता येईल. पाच वा दहा वेळा जावू देत, किमान पन्नास शंभर वेळा शोले पाहणारे अनेक फिल्म दीवाने आहेत. डीडीएलजे देखील अनेकांनी अनेकदा एन्जॉय केलाय. पण सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रावर "शोले"चा भारी प्रवाह आहे....तोही कायम स्वरुपाचा!

© दिलीप ठाकूर
(रविवार रामप्रहर "झूम" वरून साभार!)
♥

"पडद्यामागच्या गोष्टी, किस्से, मुलाखती.. आणि..!"

NEWS
ठेका
एका सूडनायकाचा जन्म झाला..
ZANJEER
- दिलीप ठाकूर

NEWS
ठेका
धर्मवीर - मुक्काम पोस्ट ठाणे!
- दिलीप ठाकूर

NEWS
ठेका
हृदय उकरून काढणारा 'दृश्यम २'..
- दिलीप ठाकूर
DRISHYAM 2

NEWS
ठेका
बनवाबनवी
...सिक्वेल तर वायलाच हवा!
- दिलीप ठाकूर

'प्रेक्षक' नसल्याने.. चित्रपट 'फ्लॉप'..!
- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

गजेश खन्ना वक्त 'मराठी' सिनेमात..!
- दिलीप ठाकूर
सुंदरा
लोकसत्ता

NEWS
ठेका
मराठी चित्रपट सुद्धा आता 'बहुभाषिक'..
- दिलीप ठाकूर
नाइमपाती

'कपूर'चा आधी 'नकार'.. मग 'होकार'..!
लोकसत्ता

NEWS
- दिलीप ठाकूर

- दिलीप ठाकूर
SANGAM
लोकसत्ता

BAJIRAO
MASTANI
- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर

- दिलीप ठाकूर
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर

- दिलीप ठाकूर

- दिलीप ठाकूर

- दिलीप ठाकूर
DilMAR
लोकसत्ता

- दिलीप ठाकूर

- दिलीप ठाकूर

माझी आणि माझ्या पुस्तकांची माहिती.

नाव- दिलीप अनंत ठाकूर

जन्म- २० एप्रिल १९६० चौल (अलिबाग) येथे

शिक्षण- पहिली ते सातवी गिरगाव म्युनिसिपल शाळा, आठवी ते अकरावी हिंद विद्यालय हायस्कूल (आंग्रेवाडी), बारावी ते तृतीय वर्ष कला शाखा (भवन्स कॉलेज, गावदेवी, गिरगाव)

बालपण- गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहा खोलीत! येथे गल्ली चित्रपट आणि गल्ली क्रिकेट खेळत वाढलो. अगदी अजूनपर्यंत आमची ही जागा

होती. तर नव्वदच्या दशकाच्या पूर्वार्धात बोरिवलीत राह्यला आलो तरी आजही मनाने पक्का गिरगावकर असल्याचा अभिमान वाटतो!

<u>पत्रकारितेतील महत्वाचे टप्पे</u> : कॉलेजमध्ये असताना वृत्तपत्रे, साप्ताहिकातून मोठ्या प्रमाणावर वाचकांसाठीच्या सदरातून पत्रलेखन, १९८२ साली "नवशक्ती" दैनिकात "प्रूफरिडर" म्हणून नोकरीला लागलो. पहिल्याच रविवारपासून नवशक्तीत चित्रपटविषयक लेखन सुरु! १९८६ साली संपादकीय विभागात बदली. २००९ साली नवशक्ती सोडून मुक्त पत्रकारीता सुरु. तोपर्यंत अनेक मराठी नियतकालिकांमधून टोपणनावाने मोठ्या प्रमाणावर लेखन! नोकरी सोडेपर्यंत टोपणनावे बरीच घेतली. "राजा दिलीप", "स्पॉटबॉय", "राजा फिल्मीस्थानी", "हीरो हीरालाल", "फिरस्ता", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "दिलीप चौलकर", वगैरे वगैरे नावे माझीच होती!

<u>माझ्या पत्रकारीतेचे वैशिष्ट्य---</u> मी पूर्णपणे फिल्डवर्कवर वाढलो, धडपडलो, घडलो. नवीन चित्रपटाचे मुहूर्त, मग शूटिंग रिपोर्टींग, प्रेस शो, मुलाखती, प्रीमियर, आऊटडोअर्स शूटिंग रिपोर्टींग, पार्ट्या यातून कायमच भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी आणि निरीक्षण यावर भर दिल्याने मला पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे मनोरंजन क्षेत्र अनुभवता आले आणि खूपच मोठ्या प्रमाणावर वेगळी माहिती, अनुभव, आठवणी, गोष्टी, किस्से वगैरे माझ्याकडे आहेत. प्रचंड एक्स्ल्युझिव्हज अशी माहिती माझ्याकडे आहे याचा कायमच अभिमान वाटतो. लहान मोठे स्टार तर झालेच पण सर्व प्रकारचे टेक्निशियन आणि चित्रपट वितरक, प्रदर्शक यांच्या भेटीसाठी, मुलाखती यातून चौफेर माहिती आणि गोष्टी समजल्या. मुंबईतील अनेक जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहे आणि चित्रपट स्टुडिओचे अनुभव घेतले आहेत. त्याबाबत वेगळी माहिती आहे!

<u>यशाची शिखरे..:</u> इंग्रजी वृत्तपत्रात (विशेषः टाईम्स ऑफ इंडिया) माझी अनेक वर्षे चित्रपटविषयक घडामोडीवर प्रतिक्रिया अथवा मत येत आहे! आणि यात तब्बल अठरा वर्षे कमालीचे सातत्य राहिले आहे. मराठी पत्रकाराला असा योग येणे हे विशेष उल्लेखनीय आहे!

<u>मला सतत होत असलेली जाणीव</u>..: मनोरंजन क्षेत्राची मला अतिशय विपुल, विस्तृत, चौफेर माहिती असली तरी ती म्हणजे पूर्णत्व असे अजिबात नाही. ते शक्यच नाही. मला भरपूर माहिती आहे, पण सगळीच माहिती आहे असे अजिबात नाही याची मला पूर्ण जाणीव आहे!

<u>माध्यम बदलाचे टप्पे..:</u> मुद्रित माध्यमात असतानाच मला सतत वाटत होते की मला वृत्त वाहिन्यांवर संधी मिळावी. तशी गुणवत्ता माझ्याकडे होती आणि माझी मेहनत घेण्याची तयारी होती. आश्चर्य वाटेल, पण मी नवशक्तीतून बाहेर पडल्यावर वृत्त वाहिन्यांचे माझ्याकडे लक्ष गेलं आणि मग त्यात मी कमालीचे सातत्य ठेवले आहे. काही वर्षातच

डिजिटल मिडियात कार्यरत झालो. मी एकाच वेळेस मुद्रित माध्यम, चॅनल आणि डिजिटल अशा तीनही माध्यमातून भरपूर काम करतोय. (एवढं काम करण्याची खरंच काही गरज आहे का असा प्रश्न अनेकदा मनात येऊ लागला आहे. चांगले काम करतोय की नाही हे माहीत नाही. पण चांगले काम करावे असे मिडियात वातावरण आहे का?)

माझ्या आयुष्यावर प्रभाव टाकणारी व्यक्ती-- श्रीकांतजी ठाकरे

पत्रकारीतेतील दीर्घकालीन आधार-- <u>भाऊ जोशी</u> (मी नवशक्तीत असताना)

आवडते दिग्दर्शक-- राज कपूर, विजय आनंद, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा. (यांचे चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांना समजले, आवडले आणि पोहचले. तेच महत्वाचे असते.)

आवडते चित्रपटगृह- "अप्सरा" (डॉ. भडकमकर मार्गावरील हे थिएटर कालांतराने इतिहासजमा झाले.)

आवडता स्टुडिओ-- लहान मोठे असे सगळेच. मुंबई, कोल्हापूर, हैदराबाद असे सगळीकडचे आवडतात. त्यात मी रमलो. अनेक गोष्टींसाठी गेलो. सगव्व्यात आवडता स्टुडिओ "फिल्मीस्थान" (गोरेगाव)

आवडते गाणे-- "दिए जलते है फूल खिलते है.." (नमक हराम) या गाण्यात आयुष्याचे तत्वज्ञान आहे.

आवडते गीतकार-- अनेक आहेत. पहिलं
गीत आणि मग त्यावर संगीत अशी जुनी गाणी
अधिक आवडतात!

आवडते संगीतकार-- राहुल देव बर्मन आणि लक्ष्मीकांत-प्यारेलाल!

आवडते लेखक आणि पत्रकार-- शिरीष कणेकर. लहानपणापासूनच त्यांचे लेखन वाचू लागलो आणि त्यापासूनच कळत नकळतपणे प्रेरणा घेतली. अर्थात, आपण (म्हणजे मी) खूपच लहान आहोत याचे भान मी कधीच सोडले नाही.

<u>माझा विलक्षण अभिमान</u>-- आपल्या आजूबाजूच्या समाजाला आपलासा वाटत असलेल्या पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटावर वर्षानुवर्षे बेहद्द प्रेम केले आणि त्यावर भरभरुन लेखन करतोय, बोलतोय. तोच खरा आपला चित्रपट आणि तीच खरी आपल्या प्रेक्षकांची उत्फूर्त संस्कृती. असा जाणकार प्रेक्षक लेखनातील एकादी चूक पटकन लक्षात आणून देतो. मीही ती खिलाडूवृत्तीने स्वीकारतो. एकादा संदर्भ माझ्याकडूनही चूकू शकतो. मी शंभर टक्के परफेक्ट नाही. आणि नवीन गोष्टी शिकण्याची माझी प्रवृत्ती सदैव कायम असते.

<u>माझा आनंद</u> : माझे आजोळ चौल येथे जाणं. मामाच्या गावाला जाऊ या... तेच माझे सासरही!

माझ्या जिव्हारी लागला-- माझ्या आईचा मृत्यू (२० ऑगस्ट २०२०)

माझे काही पुरस्कार असे,

*** मुंबई मराठी पत्रकार संघाचे दोन पुरस्कार. सर्वोत्कृष्ट पुस्तक जयहिंद प्रकाशन पुरस्कार (२००६) आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार (२००७)**

*** संस्कृती कलादर्पण २०१६ उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार.**

*** इंडिवूड मिडिया एक्स्लन्स ॲवॉर्ड २०१७ मुंबई चेंबर**

*** कलातीर्थ विशेष पुरस्कार २०१७**

*** थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट**

*** शिवसेना गिरगाव शाखा**

*** 'मी गिरगावकर' दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार!**

*** मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघ अशा अनेक संस्था माझ्या मेहनती आणि संवेदनशील कामाची दखल घेत सन्मान करीत आहेत!**

<u>माझी पुस्तके (संख्या वाढत राहिली हे नक्की.)</u>

बॉलीवूड (संवेदना प्रकाशन)

क्लॅप (नवचैतन्य)

आऊट फोकस (अनघा)

ओपन थिएटर (नाविन्य)

मॅटीनी शो (सानिया)

फस्ट डे फर्स्ट शो (अनघा)

तीन देविया (नवचैतन्य)

रेखा म्हणजे तारुण्य (संवेदना)

पार्टी (नवचैतन्य)

बडीशेप (अनघा)

पैसा वसूल (पारस)

अप्पर स्टॉल (आमोद)

तारांगण (संवेदना प्रकाशन)

आडपडदा (श्रीकल्प)

स्थित्यंतरातील सिनेमा (सायली)

'हौस' फुल्ल (सायली)

फिल्मी मसाला पापड (अनघा)

स्टॉलचा पब्लिक (अनघा)

सिनेमा घर (अनघा)

सिनेमाला चला तुम्ही (अनघा)

अ... अमिताभचा (सायली)

फस्ट टेक (आमोद)

ॲक्ट्रेस (अनघा)

ब.... बच्चनचा (सायली)

करंट बुकिंग (संवेदना)

एक्स्ट्रा तिकीट (श्रीकल्प)

वलय आणि वळणे (सायली)

सिनेमाची वेळ (अनघा)

गल्ला पेटी (पारस)

ओन्ली रेखा (संवेदना)

यादगार पल (पारस)

स्कॅन्डल (संवेदना)

मराठी ठसा (अनघा)

कॉर्नर सीट (अनघा)

चुळबूळ (श्रीकल्प)

शेगडी (अनघा)

मल्टीप्लेक्समध्ये वडापाव (अनघा)

आडपडदा (आवृत्ती २) (विघ्नेश पुस्तक भांडार)

सिनेमा मसाला मिक्स (नवचैतन्य)

डबल रोल (विघ्नेश पुस्तक भांडार)

बारा ते तीन, तीन ते सहा, सहा ते नऊ (संवेदना)

थेटरातील टाळ्या शिट्ट्या (नाविन्य)

टॉकीजची गोष्ट (अनघा)

सिनेमा खिचडी (नाविन्य प्रकाशन)

ई बुक (ई-साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने प्रकाशित)

शोले पन्नास वर्षे

सुपर डुपर हिट

माझी स्टुडिओजमधील मुशाफिरी (आगामी)

राजकीय

शिवसेनाप्रमुख (शुभ प्रकाशन)

<u>* महत्वाचे...</u> माझे सर्व लेखन उत्तम अथवा वाचनीय आहे असा माझा अजिबात दावा नाही. आणि ते शक्यही नाही. जेव्हा चांगले लिहिले तेव्हा वाचक आनंदला आणि जेव्हा अगदी सामान्य लिहिले तेव्हा वाचक खूपच सांभाळून घेतात याची पूर्ण जाणीव आहे.

*** चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या वतीने 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट सूची' (३ मे १९१३ ते ३ मे २०१३) या संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. त्या सूचीच्या संपादन करण्याचा योग मला आला. त्यानिमित्ताने फाऊंडेशनचे अध्यक्ष किरण शांताराम यांचे खूप खूप आभार. या सूचीचे प्रकाशन २०१४ साली तात्कालिक मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस आणि अमिताभ बच्चन यांच्या शुभ हस्ते करण्यात आले तो माझ्यासाठी सर्वोच्च आनंदचा क्षण होता. दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक आणि माध्यम**

क्षेत्रातील अनेक मान्यवर हजर होते. विशेष म्हणजे या सोहळ्यात अमिताभ बच्चनने मराठीत भाषण केले.

*** राज्य मराठी चित्रपट महोत्सवाच्या पन्नासाव्या अर्थात सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त (२०१४) प्रकाशित करण्यात आलेल्या विशेषांकाच्या संपादक मंडळात माझा सहभाग.**

*** इंग्लंडमध्ये वास्तव्यास असलेल्या लेखक मिहिर बोस यांच्या इंग्रजी भाषेतील चित्रपटविषयक माहितीपूर्ण खंडासाठी सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील हिंदी चित्रपटसृष्टीविषयक माहिती दिली. व्दारकानाथ संझगिरी यांनी ही अतिशय उपयुक्त अशी संधी उपलब्ध करून दिली.**

*** एबीपी माझा या वृत्तवाहिनीवर अश्विन बापट यांच्याऱसबत जुन्या काळातील मराठी व हिंदी चित्रपटातील गीत, संगीत व नृत्य यावर विशेष फ्लॅशबॅक. या लोकप्रिय कार्यक्रमाचे पन्नास कार्यक्रम.**

***सामना चित्रपट पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पुणे शहरातील सोहळ्यात विशेष सहभाग!**

आपल्या शुभेच्छा आणि आशीर्वाद हेच माझे संचित !

धन्यवाद! लोभ असावा ही नम्र विनंती!

आपला नम्र,
दिलीप ठाकूर

♥

♥

विशेष आभार : लेखक : डॉ. अनंत पावसकर, (संरचना/मुखपृष्ठ/ले-आऊट)

♥

♥



ई-ये मराठीचिये नगरी

जो जे **वाचील** तो ते लाहो

पुस्तकाच्या कव्हरवर फक्त एक क्लिक आणि पुस्तक उघडेल.

आता सर्व पुस्तकांच्या छापिल आवृत्ती उपलब्ध आहेत. आपली मागणी नोंदवा WhatsApp- 9987737237

https://chat.whatsapp.com/KybNQeSmpaF46C47GyeXQl?mode=ac_t

esahity free ebooks_46

आपण या ग्रुपमध्ये सामील झाल्यावर वर्षाला १०० ते २०० मराठी ई पुस्तकं विनामूल्य नियमित प्राप्त होतील.